उगें राहतां आपण । उठून जाती मुनिगण । यालागीं प्रश्नावरी प्रश्न । विचित्रविंदान पुसतु ॥ ६७ ॥ स्वानंदें लोधली चित्तवृत्ती । इंद्रियें वेधलीं सुखस्थिती । राजा निवाला निश्चितीं । तरी प्रश्नोक्ती पुसत ॥ ६८ ॥ पुसेल हरीचे अवतार । ते कथा सुंदर मनोहर । निरूपण अतिअरुवार । निजजिव्हार निववील ॥ ६९ ॥ त्या प्रश्नाचें प्रत्युत्तर । कथाकौतुक सनागर । एका जनार्दनाचे किंकर । उपानहधर संतांचे ॥ ८७० ॥ संत सज्जन कृपास्थिती । श्रीजनार्दन वरदमूर्ती । पुढील कथेची उत्पत्ती । सांगेन यथार्थी अर्थुनी ॥ ७१ ॥ श्रीभागवताचे राशीवरी । एकाजनार्दन केला मापारी । तो निजबोधाचे कुडवावारीं । भरील वखारी श्रवणाच्या ॥ ७२ ॥ इति श्रीभागवते महापुराणे एकादशस्कंधे निमिजायंतसंवादे मायाकर्मब्रह्मनिरूपणं नाम तृतीयोऽध्यायः ॥ ३ ॥

इति श्रीमद्भागवते महापुराणे एकादशस्कंधे तृतीयोऽध्यायः ॥ ३ ॥

अध्याय चवथा.

श्रीगणेशायनमः ॥ ओं नमो श्रीगुरु शिवशिवा । नमनें जीवत्व जीवा । नुरविसी तेथें देहभावा । कैसेनि रिघावा होईल ॥ १ ॥ जीवें घेऊनि जीवा । देहत्व मोडूनि देहभावा । याहीवरी करविसी सेवा । हें लाघव देवा नवल तुझें ॥ २ ॥ जीव घेऊनि शंखासुरा । त्याच्या वागविसी कलेवरा । तो तूं रिघोनि मजभीतरा । माझिया शरीरा वागविसी ॥ ३ ॥ शंख मधुर ध्वनीं गाजे । तो वाजवित्याचेनि वाजे । तेवीं म्या जें जें बोलिजे । तें तें बोलणें साजे तुझेनी ॥ ४ ॥ आतां

मुकाट्यानें बसलों तर हे मुनिगण उठून जातील या भीतीनें तो चतुर राजा प्रश्नांवर प्रश्न विचारूं लागला. ६७ राजाची चित्तवृत्ति स्वानंदानें भरून गेली. इंद्रियें सुखानें वेधलीं. राजा पूर्णपणें शांत झाला. तथापि त्यानें प्रश्न विचारिलाच. ६८ तो आतां पुढच्या अध्यायांत हरीचे अवतार विचारील. ती कथा फारच सुंदर आहे आणि निरूपणहि अति रमणीय होणार आहे. तें खरोखर श्रोत्यांच्या चित्ताला विश्रांति देईल. ६९ त्या प्रश्नाचें प्रत्युत्तर म्हणजे एक रमणीय कथाकौतुकच आहे. हा एकनाथ जनार्दनाचा किंकर व संतांचीं पादत्राणें धारण करणारा आहे. ८७० तो आतां संत व सज्जन यांच्या कृपेनें व वरदमूर्ति श्रीजनार्दनाच्या अनुग्रहानें पुढील कथा यथार्थ अर्थानें सांगेल. ७१ श्री भागवताच्या राशीवर एका जनार्दनाला माप घालणारा केला आहे; तो आत्मबोधाच्या कुडवांनीं श्रवणाच्या वखारी भरील. ८७२.

इति श्रीमद्भागवतमहापुराणांतील एकादशस्कंधाचा परमहंससंहितेमधला श्रीधर-एकनाथविरचित टीकांनुसार विष्णुशर्मकृत सान्वयार्थ-भावार्थासह निमिजायंतसंवादांतील मायाकर्मब्रह्मनिरूपण नांवाचा तिसरा अध्याय समाप्त झाला.

श्रीगुरु शिव-पार्वती यांस नमस्कार असो. भगवान् नमनानें संतुष्ट होऊन जीवाचें जीवत्व राहूं देत नाहीं. तेथें देहभावाचा रिघाव कोठून होणार ! १ हे देवा, जीवाचा जीव घेऊन व देहाचें देहत्व नाहींसें करूनहि त्याच्याकडून सेवा करवितोस, हें तुझें केवढें आश्चर्यकारक लाघव आहे ! २ शंखासुराचा जीव घेऊन त्याच्या शरीराला जसा वागवितोस तसाच तूं माझ्यामध्येंहि प्रवेश करून माझ्या शरीरालाहि वागवीत आहेस. ३ शंख मधुर ध्वनीनें गर्जना करितो, पण तो वाजविणाराच्या बळानें वाजतो. त्याचप्रमाणें मी जें जें कांहीं बोलतो तें सर्व तुझ्यामुळेंच

माझें शरीर जें चळे । तें तुझेनि आंगिकें मेळें । कर्में निपजती सकळें । सत्ताबळें तुझेनी ॥ ५ ॥ माझे देहींचें जें मीपण । तें तूंचि झालासी आपण । तुझेनि प्राणें प्राण । माझाही जाण चले देवा ॥ ६ ॥ दृष्टीं जें जें कांहीं देखें । तें तें तुझेनि ज्ञानउन्मेखें । श्रवणीं जें जें कांहीं ऐकें । तें तें नेटकें अवधान तुझें ॥ ७ ॥ रसना जें जें कांहीं चाखे । तें तें तुझेनि स्वादमुखें । बुद्धि जाणपणें तोखे । तेंही अतिनिकें वेद-कत्व तुझेनी ॥ ८ ॥ मन मनपणें अतिचपळ । तेंही तुझेंचि आंगिक बळ । बिवेका बिवेकु प्रबळ । अति-सोज्ज्वळ तुझेनी ॥ ९ ॥ वाचा जें जें कांहीं वदे । तें वाचिकत्व तुझेनि शब्दें । बोधु जेणें उद्‌बोधे । तो तुझेनि प्रबोधें प्रबोधू ॥ १० ॥ जागृती जागे तुझेनि हरिखें । स्वप्न स्वप्ना तुझेनि देखे । सुषुप्ती सुखावे जेणें सुखें । पूर्ण संतोखें तुझेनी ॥ ११ ॥ मी जे जे बिषय भोगीं । तें भोक्तेपण तुझे अंगीं । तुझेनि निजसंयोगीं । मीपणें जगीं वर्तविशी मज ॥ १२ ॥ माझें करूनि खांबसूत्र । तूं झालासी सूत्रधार । हालवूनियां निजसूत्र । कर्में विचित्र करविशी ॥ १३ ॥ ऐशिया श्रीजनार्दना । जग चेतवित्या चिद्‌घना । कृपाळुवा जगजीवना । नमन श्रीचरणा तुझेनि तुज ॥ १४ ॥ यापरी मजमाजीं तूं चाळिता । चाळकत्वें करविसी ग्रंथा । तेथें मी एक कवित्व कर्ता । हें जाणावी तत्वतां स्थूळबुद्धी ॥ १५ ॥ एका एकु जना-र्दनीं । कीं जनार्दनु एकपणीं । यथा पृथक् नामांचीं लेणीं । लेऊनि एकपणीं मिरविसी तूं ॥ १६ ॥ जेवीं कनकाचें भूषण । कीं भूषणीं कनक संपूर्ण । तेवीं एका आणि जनार्दन । एकत्वें जाण जनार्दनचि ॥ १७ ॥ ऐशी ऐकोन बिनवणी । सद्‌गुरु तुष्टला संतोषोनी । तेथें भिन्न भिन्न सोसणी । न लगे निरू-पणीं करणें तुज ॥ १८ ॥ जेवीं कापुरा आगी झगटे । तेव्हांचि कापुरत्व खुंटे । सच्छिष्यासी सद्‌गुरु भेटे । तेव्हांचि फिटे भिन्नभेदू ॥ १९ ॥ जेणें फिटे भिन्नभेदु । तो श्रीभागवतीं निजबोधू । वसुदेवाप्रती नारदू । सांगती संवादू इतिहासाचा ॥ २० ॥ ज्या इतिहासाचा अर्थ । परिसतां प्रगटे परमार्थ । स्वानंद-बोध हृदयांत । श्रवणें सदोदित श्रोते होती ॥ २१ ॥ तंव श्रोते संतसमुदावो । म्हणती कैसा नवलावो ।

होय. ४ माझें शरीर जी हालचाल करितें व जीं लौकिक, वैदिक कर्में करितें तीं सर्व तुझ्याच सत्ताबळानें होतात. ५ माझ्या देहांतील 'मीपणा' तूंच झालास. तुझ्या क्रियाशक्तीनेंच माझा क्रियाशक्ति प्राण चालतो. ६ तुझ्याच ज्ञानशक्तीनें डोळे पहातात, कान ऐकतात, ७ रसना रस चाखिते, बुद्धि ज्ञानानें संतुष्ट होतें, ८ मन संकल्प-विकल्पानें चंचल होतें, विवेकशक्ति विवेचन करिते, ९ वाणी बोलते व ज्ञानशक्ति तुझ्याच बलानें सर्व कांहीं जाणते. १० जागृति, स्वप्न व सुषुप्ति यांतील सर्व अनुभव तुझ्याचमुळें येतात. ११ मी ज्या विषयांचा भोग घेतों, त्यांचें भोक्तृत्वहि तुलाच आहे. तुझ्या स्वरूपसंबंधानेंच तूं मला 'मी-' पणानें वागवितोस. १२ तूं सूत्रधार झालास, मला कळसूत्री बाहुलें केलेंस आणि सूत्रें हालवून माझ्याकडून विचित्र कर्में करवितोस. १३ अशा जगच्चालक, चिद्घन, कृपाळू जगज्जीवाच्या श्रीचरणांना माझें नमन असो. १४ याप्रमाणें तूं माझ्यामध्यें चालक आहेस. त्या चालकत्वानेंच तूं मजकडून ग्रंथ करवितोस. पण असें असतांनाहि 'मी कवित्व करितों' हा निवळ भ्रम आहे. १५ एकनाथ जनार्दनामध्यें एकरूप आहे व जनार्दन एकपणानें—एकरूपानें एकनाथभावाला प्राप्त झाला आहे. ही भिन्न भिन्न नावांचीं लेणीं लेवून तूं एकत्वानें मिरवीत आहेस. १६ ज्याप्रमाणें सोन्याचें भूषण व भूषणांमध्यें ओतप्रोत सोनेंच, त्याप्रमाणें एकनाथ आणि जनार्दन हे एकत्वानें जनार्दनच आहेत. १७ अशी ही विनंती ऐकून सद्‌गुरु संतुष्ट झाला आणि म्हणाला कीं, निरूपणासाठीं तुला अशी भिन्न भिन्न कल्पना करावयास नको. १८ कापुराला अग्नि लागला म्हणजे त्याचा कापुरपणा जसा खुंटतो, १९ त्याप्रमाणें सच्छिष्याला सद्‌गुरू भेटला असतां भिन्नभाव तेव्हांच फिटतो. ज्याच्या योगानें भिन्नभाव नाहींसा होईल असाच श्रीभागवतामध्यें आत्मबोध आहे. नारद वसुदेवाला हा इतिहास सांगत आहे. २० त्याचा अर्थ ऐकिला असतां परमार्थ प्रकट होतो व श्रोते त्याच्या श्रवणानें सदोदित संतुष्ट होतात. २१ त्यांच्या हृदयांत स्वानंदबोध प्रकट होतो. इतक्यांत श्रोत्यांचा संतसमुदाय म्हणाला—'काय आश्चर्य आहे हो ! सद्‌गुरूचें स्तवन करीत असतांनाच तूं अभेदपणें ब्रह्म-

सद्गुरुस्तवनीं ब्रह्मभावो । साधिला आवो अभेदत्वें ॥ २२ ॥ हे सद्गुरूची विनवणी । कीं ब्रह्मसुखाची खाणी । परिसतां सप्रेम बोलणीं । रिझली आयणी सज्जनांची ॥ २३ ॥ या देशभाषा वाणी । उघडिली परमार्थाची खाणी । बोल नव्हती हे स्पर्शमणी । लागतां श्रवणीं पालटे जीवू ॥२४॥ यापरी श्रीभागवतीं । अनुपम अगाध स्थिती । ते कथेची संगती । लावी सुनिश्चितीं अर्थावबोधें ॥ २५ ॥ ऐकोनि संतांचें वचन । शिरीं वंदोनि त्यांचे चरण । पुढील कथानिरूपण । श्रोतीं सावधान परिसावें ॥ २६ ॥ येथें तृतीय अध्यायाचे अंतीं । निरूपितां तांत्रिक भक्ती । भजावें आवडेल ते मूर्ती । रायासी तदर्थीं प्रश्न स्फुरला ॥ २७ ॥ देवो एकचि त्रिजगतीं । त्याच्या किती अवतार मूर्ती । जन्म कर्म अनेक व्यक्ती । हेंचि मुनीप्रति पुसतु ॥ २८ ॥

रा०—यानि यानीह कर्माणि यैर्यैः स्वच्छन्दजन्मभिः । चक्रे करोति कर्ता वा हरिस्तानि ब्रुवन्तु नः ॥ १ ॥

मुनीश्वरांचें अगाध ज्ञान । त्याहीवरी रसाळ निरूपण । तेणें रायाचें वेधलें मन । प्रश्नावरी प्रश्न यालागीं पुसे ॥ २९ ॥ तो म्हणे देवाधिदेवो हरी । स्वलीला कैसीं जन्में धरी । स्वेच्छा जीं जीं कर्में करी । ते अगाध थोरी मज सांगा ॥ ३० ॥ म्हणती देवा नाहीं जन्म । तेथें कैंचें पुससी कर्म । देवो अरूप अनाम । त्यासी जन्म कर्म असेना ॥ ३१ ॥ तो अजन्मा परी जन्म धरी । अकर्मा परी कर्में करी । विदेही तो देहधारी । होऊनि संसारीं स्वधर्म पाळी ॥ ३२ ॥ त्याच्या अवतारांची स्थिती ।

भाव साधिलास. २२ ही काय सद्गुरूची विनवणी कीं ब्रह्मसुखाची खाणी ! असें हें तुझें सप्रेम भाषण ऐकून सज्जनांची चित्तवृत्ति प्रसन्न झाली आहे. २३ या प्राकृत भाषेंत तूंहि परमार्थाची खाणच उघडली आहेस. हे शब्द नव्हेत, तर परीस आहेत, ते कानांवर येतांच जीव जीवपण सोडून स्वरूपास प्राप्त होतो. २४ भागवतामध्यें आत्मबोधाची अशी अनुपम अगाध स्थिति आहे. त्यांतील कथेची संगति अर्थज्ञानानें चांगल्या प्रकारें लाव.' २५ हें संतांचें वचन ऐकून व त्यांच्या चरणांवर मस्तक ठेवून पुढील कथेचें मी निरूपण करितों, तें श्रोत्यांनीं सावधान चित्तानें ऐकावें. २६ तिसऱ्या अध्यायाच्या शेवटीं तांत्रिक भक्तीचें निरूपण करीत असतांना 'आवडेल त्या मूर्तीचें भजन करावें' असें जें सांगितलें आहे, त्यावरून राजाला पुढील प्रश्न स्फुरला २७ व 'या त्रिभुवनांत देव एकच आहे, पण त्याच्या अवतारमूर्ति किती आहेत ? त्याचे जन्म व कर्में यांचे अनेक प्रकार कसे झाले ?' असें तो मुनींना विचारूं लागला. २८.

(या चवथ्या अध्यायांत अवतार व त्यांतील कार्यें याविषयींच्या प्रश्नाचें उत्तर जयंतिपुत्र द्रुमिलानें सांगितलें आहे.)

—'आत्म्याच्या प्रिय अवतारांचें पूजन करावें' असें तिसऱ्या अध्यायांत ४८ व्या श्लोकांत सांगितलें आहे. त्यावरून अवतारज्ञानाची आकांक्षा होते; तसेंच स्तोत्रांनीं स्तुति करून हरीला नमस्कार करावा, असें ५३ व्या श्लोकांत सांगितलें असल्यामुळें त्याच्या गुणकर्मज्ञानाची आकांक्षा भासते; म्हणून त्याविषयीं राजा प्रश्न करीत आहे—

राजा उवाच—राजा बोलला, हरिः—भगवान्, यैः यैः स्वच्छन्दजन्मभिः—स्वेच्छेनें घेतलेल्या ज्या ज्या अवतारांनीं, इह—यालोकीं, यानि यानि कर्माणि चक्रे—जीं जीं कर्में करिता झाला, करोति—करीत आहे, कर्ता वा—किंवा पुढें करील, तानि नः ब्रुवन्तु—तीं आम्हांला सांगा. १.

मुनीश्वरांचें ज्ञान अगाध होतें व निरूपण तर त्याहिपेक्षां रसाळ होतें. त्यामुळें राजाचें मन वेधलें व तो प्रश्नांवर प्रश्न विचारूं लागला. २९ तो म्हणाला, देवाधिदेव हरि स्वलीलेनें अवतार कसे धारण करितो व स्वेच्छेनें कोणकोणतीं कर्में करितो, ती त्याची अगाध थोरवी मला सांगा, ३० तुम्ही कदाचित् असें म्हणाल कीं, देवाला जन्मच नाहीं तेथें कर्म कसलें विचारितोस ? देव अरूप, अनाम आहे, त्याला जन्म, कर्म नाहीं, ३१ पण तो अज असूनहि जन्म घेतो. कर्मरहित असूनहि कर्में करितो. देहशून्य असतांना देहधारी होऊन संसारांत स्वधर्म

कवण जन्म कवण व्यक्ती । किती अवतार किती मूर्ती । कृपेनें मजप्रती सांगा स्वामी ॥ ३३ ॥ जे कां अतीत अनागत । वर्तमान जे प्रस्तुत । ते अवतार समस्त । इत्थंभूत सांगावे ॥ ३४ ॥ हरिचरित्र अवतारगुण । प्रतिपादन करावयाचा प्रश्न । तो सांगावया जयंतीनंदन । स्वानंदें पूर्ण द्रुमिल सांगे ॥३५॥

द्रुमिल उवाच–यो वा अनन्तस्य गुणाननन्ताननुक्रमिष्यम् स तु बालबुद्धिः ।
रजांसि भूमेर्गणयेत्कथंचित्कालेन नैवाखिलशक्तिधाम्नः ॥ २ ॥

ज्याची लीलाशक्ति अपरिमित । ऐशा अनंत शक्ती ज्याच्या नखांत । यालागीं तो अनंत म्हणत । त्याचे गुण समस्त गणवती कोणा ॥ ३६ ॥ त्या अनंताची गुणसमृद्धी । गणूं म्हणे तो बालबुद्धी । जेवीं कां आकाशाची वृद्धी । मुंगिये त्रिशुद्धी न करवे माप ॥ ३७ ॥ सागरींचें जळ संपूर्ण । केवीं गणूं शके लवण । तेवीं अनंताचे अनंत गुण । आकळी कवण निजसत्ता ॥ ३८ ॥ पर्जन्याचिया धारा । गणितां येतील नृपवरा । पृथ्वीचिया दूर्वांकुरां । सुखें महावीरा गणितां येती ॥ ३९ ॥ वारा अफाट धांवे । तोही गणितातें पावे । निमेषोन्मेषांचे यावे । त्यांसीही संभवे गणित राया ॥ ४० ॥ पृथ्वीचिया परिमाणा । काळें काळें होय गणना । परी भगवंताचिया गुणां ॥ वेदांसही जाणां गणित नव्हे ॥ ४१ ॥ भगवंताचें

पाळितो. ३२ त्याच्या अवतारांच्या स्थिति, जन्म कोणते, व्यक्ति कोणत्या, अवतार किती, मूर्ति किती, हें मला कृपा करून सांगा. ३३ जें मागें होऊन गेलें, पुढें होणार आहे व प्रस्तुत समयीं आहे, तें सर्व इत्थंभूत मला सांगा. ३४ याप्रमाणें राजानें हरीचें चरित्र व अवतारगुण यांचें प्रतिपादन करण्याविषयीं प्रश्न केला. त्याचें उत्तर जयंतिनंदन द्रुमिलमुनि सांगूं लागला. ३५.

—तूं विचारलेले तिन्ही कालांतील सर्व अवतार, गुण व कर्मे सांगणें शक्य नाहीं; तथापि मी त्यांतील कांहीं संक्षेपतः सांगतों—

द्रुमिलः उवाच–द्रुमिल म्हणाला, यः वै-जो कोणी, अनंतस्य अनंतान् गुणान्–अनंताच्या अनंत गुणांची, अनुक्रमिष्यन्-गणना करूं इच्छितो, सः तु बालबुद्धिः–तो बालकाप्रमाणें मंदबुद्धि होय. भूमेः रजांसि–भूमीचे रजःकण, कालेन कथंचित् गणयेत्–दीर्घकालानें एखादा महामति मोजीलहि; पण, अखिलशक्ति धाम्नः न एव–सर्वशक्तींचा आश्रय जो भगवान् त्याचे गुण कोणालाहि मोजतां येणार नाहींत. [अनंताच्या अनंत गुणांची गणना करण्यास जो इच्छितो, तो खरोखर लहान बालकाप्रमाणें मंदमति होय. कारण एखाद्या महाबुद्धिमान् पुरुषाला दीर्घकालानें भूमीवरील धुळीचे कण कदाचित् मोजतां येतीलहि; पण सर्वशक्तिमान् भगवानाचे गुण कोणीहि मोजूं शकणार नाहीं. ‘ विष्णोर्नु कंवीर्याणि० ’ इत्यादि श्रुतींत हेंच सांगितलें आहे.] २.

ज्याच्या नखांत अनंत लीलाशक्ति रहातात व त्यासाठींच त्या अपरिमित लीलाशक्तिमानाला अनंत म्हणतात, त्याच्या सर्व गुणांची गणना कोण करणार ! ३६ मी अनंताच्या गुणांची गणना करितों. असें जो म्हणतो, तो खरोखर मंदमति होय. मुंगीला आकाशाच्या लांबीरुंदीचें माप जसें कधींहि करवत नाहीं, ३७ किंवा मीठ सागरांतील सर्वजलांचें प्रमाण जाणत नाहीं, त्याप्रमाणें अनंताचे अनंत गुण आपल्या बुद्धिबलानें कोण जाणणार ! ३८ पर्जन्याच्या धारा मोजितां येतील, पृथ्वीवरील दूर्वांकुरांचीहि गणना करितां येईल, ३९ अफाट धांवणाऱ्या वाऱ्याचेंहि गणित करितां येईल, डोळ्यांच्या उघड-झापींचेंहि प्रमाण ठरवितां येईल, ४० पृथ्वीचें परिमाणहि केव्हां केव्हां निश्चित करितां येईल, पण भगवंताच्या गुणांचें गणित वेदांनाहि करितां येत नाहीं. ४१ तेथें भगवंताचें एक नांव

नाम एक । घेतां वेद झाले मूक । त्याचे गुण गणितां सकळिक । शेषाचें मुख दुखंड झालें ।। ४२ ।। त्या अनंताचे अनंत गुण । येथ गणूं शके कवण । कांहीं एक संक्षेपें जाण । सांगेन लक्षण अवतारांचें ।। ४३ ।।

भूतैर्यदा पञ्चभिरात्मसृष्टैः पुरं विराजं विरचय्य तस्मिन् ।
स्वांशेन विष्टः पुरुषाभिधानमवाप नारायण आदिदेवः ।। ३ ।।

अवतारांमाजीं प्रथमतां । पुरुषावताराची कथा । द्रुमिल झाला सांगता । ऐक तत्वतां महाराजा ।। ४४ ।। नारायणें आत्मशक्तीं । पंचमहाभूतें भूताकृती । सृजूनियां यथानिगुतीं । ब्रह्मांडाची स्थिती निर्माण केली ।। ४५ ।। ' विराजपुरुष ' ब्रह्मांडा नाम । तेथ लीला प्रवेशे देवोत्तम । यालागीं ' पुरुष ' हें नाम । पुरुषोत्तम स्वांशें पावे ।। ४६ ।। त्याचेनि अंशयोगें प्रकृती । झाली प्रजातें प्रसवती । यालागीं पुरुषनामस्थिती । जाण निश्चितीं पावला ।। ४७ ।। तो अकर्तात्मयोगयुक्तीं । जग चेतवी चिच्छक्ती । ज्याचेनि जगा जगत्त्वें स्फूर्ती । त्याची गुणकीर्ती दों श्लोकीं सांगों ।। ४८ ।।

यत्काय एष भुवनत्रयसन्निवेशो यस्येन्द्रियैस्तनुभृतामुभयेन्द्रियाणि ।
ज्ञानं स्वतः श्वसनतो बलमोजईहा सत्त्वादिभिः स्थितिलयोद्भव आदिकर्ता ।। ४ ।।

घेतांच वेद मुके झाले. त्याच्या सर्व गुणांची गणना करितांना शेषाच्या एका जिव्हेच्या दोन जिव्हा झाल्या. ४२ तेथें त्या अनंताचे अनंत गुण कोण सांगूं शकणार ! तथापि मी आतां संक्षेपानें अवताराचें लक्षण सांगतों. ४३.

—अगोदर त्यांतील पुरुषावतार सांगतात—

यदा—जेव्हां, **आत्मसृष्टैः पंचभिः भूतैः**—स्वतः उत्पन्न केलेल्या पंचमहाभूतांनीं, **विराजं पुरं विरचय्य**—ब्रह्माण्ड हें नगर निर्माण करून, **तस्मिन् स्वांशेन विष्टः आदिदेवः नारायणः**—त्यांत स्वतःच्या कल्पित अंशानें प्रविष्ट झालेला आदिदेव नारायण, **पुरुषाभिधानं अवाप**—पुरुष या नांवाला प्राप्त झाला. [स्वतः उत्पन्न केलेल्या पांच भूतांनीं ब्रह्माण्डरूप नगराची रचना करून त्यांत जेव्हां हा देवाधिदेव नारायण आपल्या अभासरूप अंशानें प्रकट झाला तेव्हां त्याला पुरुष हें नांव प्राप्त झालें.] ३.

हे महाराजा, ऐक, असें म्हणून द्रुमिल भगवानाच्या अवतारांतील पहिल्या पुरुषावताराची कथा सांगूं लागला. ४४ नारायणानें आत्मशक्तीनें भूताकार पंचमहाभूतें उत्पन्न करून क्रमानें ब्रह्मांडाची स्थिति निर्माण केली. ४५ ब्रह्माण्ड हेंच विराट्पुरुषाचें शरीर आहे. त्यांत देवोत्तमानें स्वांशानें लीलेनें प्रवेश केला, म्हणून त्याला पुरुष हें नांव प्राप्त झालें. ४६ त्याच्या अंशाच्या संबंधानें माया प्रजेला प्रसवली. म्हणून त्याचें पुरुष हें नांव रूढ झालें. ४७. जो स्वतः अकर्ता असूनहि आपल्या योगशक्तीनें सर्व जगाला चिच्छक्ति देऊन चेतवितो व ज्याच्यामुळेंच जगाची जगत्त्वानें स्फूर्ति होते, त्याची गुणकीर्ति या पुढील दोन श्लोकांनीं सांगतों. ४८.

—द्रुमिल पुढील दोन श्लोकांनीं भगवानाचीं गुणकर्में सांगतो—

यत् काये—ज्याच्या अधिष्ठानभूत शरीरांत, **एषः भुवनत्रयसन्निवेशः**—ही त्रिभुवनाची रचना आहे, **यस्य इंद्रियैः**—ज्याच्या इंद्रियांनीं, **तनुभृतां उभयेन्द्रियाणि**—सर्व समष्टि-व्यष्टि जीवांचीं ज्ञानेंद्रियें व कर्मेंद्रियें झालीं, **यस्य स्वतः ज्ञानं**—ज्याच्या स्वरूपभूत सत्त्वापासून प्राण्यांचें ज्ञान झालें, **यस्य श्वसनतः बलं ओजः ईहा**—ज्याच्या प्राणापासून प्राण्यांची देह-शक्ति, इंद्रियशक्ति व क्रिया झाली, **यः सत्त्वादिभिः**—व जो सत्त्वादि गुणांनीं, **स्थितिलयोद्भवे आदिकर्ता**—जगाच्या उत्पत्ति, स्थिति, लय यांतील आदिकर्ता, [ज्याचा हा अधिष्ठेय देह हीच या त्रिभुवनाची रचना आहे किंवा ज्याच्या देहांत हा त्रिभुवनाचा रचनाविशेष आहे, ज्याच्या इंद्रियांनीं समष्टि-व्यष्टि जीवांचीं ज्ञानकर्मेंद्रियें झालीं, ज्याच्या स्वरूपभूत सत्त्वापासून प्राण्यांचें ज्ञान झालें किंवा ज्याचें ज्ञान स्वतःसिद्ध आहे, ज्याच्या प्राणापासून जीवांचें शरीसामर्थ्य, इंद्रियसामर्थ्य व क्रियाशक्ति उद्भवली, जो सत्त्वादिगुणांनीं स्थिति, लय व उद्भव यांचा आदिकर्ता आहे.] ४.

आदावभूच्छतधृती रजसाऽस्य सर्गे विष्णुः स्थितौ क्रतुपतिर्द्विजधर्मसेतुः ।
रुद्रोऽप्ययाय तमसा पुरुषः स आद्य इत्युद्भवस्थितिलयाः सततं प्रजासु ॥ ५ ॥

त्रैलोक्य बसे जें कांहीं । तेंचि शरीर त्याचें पाहीं । ज्याचेनि योगें देही । ठायींच्या ठायीं वर्तती ॥ ४९ ॥ ब्रह्मादिक तनुधारी । त्यांच्या ज्ञानकर्मेंद्रियांची थोरी । ज्याचेनि इंद्रियविकारीं । निजव्यापारीं वर्तती ॥ ५० ॥ जो जगाचे नयनांचा नयन । जो जगाच्या घ्राणांचें घ्राण । जो जगाच्या श्रवणांचें श्रवण । रसनेची जाण रसना जो कां ॥५१॥ जो जगाच्या हातांचें हात । ज्याचे पाय जगाच्या पायांत । जो वाचेची वाचा निश्चित । एवं उभयइंद्रियांआंत इंद्रियें ज्याचीं ॥ ५२ ॥ जीवाच्या ठायीं जें कां ज्ञान । तेंही त्याचेनि ज्ञानें जाण । त्यासी ज्ञानदाता नाहीं आन । स्वयें ज्ञानघन स्वभावतांची ॥ ५३ ॥ ज्याचेनि प्राणें जाण । जगाच्या चळे प्राण । बळ तेज क्रियाचरण । जगासी संपूर्ण ज्याचेनि ॥ ५४ ॥ रजतमसत्वादिगुणयुक्त । उत्पत्तिस्थितिप्रळयांत । मूळीं आदिकर्ता भगवंत । जाण तो निश्चित पुरुषावतार ॥५५॥ सत्वादि त्रिगुणावस्था । उत्पत्ति-स्थिति-लयकर्ता । तेही गुणावतारकथा । ऐक नृपनाथा सांगेन ॥ ५६ ॥ तोचि आदिकल्पीं उत्पत्ती । रजोगुणें राजसा शक्ती । स्वयें झाला शतधृती । 'ब्रह्मा' म्हणती जयातें ॥ ५७ ॥ एवं ब्रह्मरूपें उत्पत्ती । स्रजिता झाला राजसा शक्ती । तेथें प्रतिपाळावया स्वधर्मस्थिति । सत्वगुणें निश्चितीं 'श्रीविष्णु' जाहला ॥ ५८ ॥ तो द्विजधर्मप्रतिपाळणु । यज्ञभोक्ता श्रीविष्णु । देखतां धर्माचा अवगुणु । अवतरे नारायणु नानावतारीं ॥ ५९ ॥ तोचि ये सृष्टीचे प्रांतीं । तमोगुणें तामसा

यस्य रजसा—ज्याच्या रजोगुणानें, आदौ अस्य सर्गे—आरंभीं या जगाच्या उत्पत्तीसाठीं, शतधृतिः अभूत्—ब्रह्मदेव झाला, स्थितौ क्रतुपतिः द्विजधर्मसेतुः विष्णुः अभूत्—ज्याच्या सत्त्वगुणानें स्थितीसाठीं यज्ञांचें फल देणारा, ब्राह्मण व त्यांचे धर्म यांचा पालक विष्णु झाला, तमसा अप्ययाय रुद्रः अभूत्—ज्याच्या तमोगुणानें सृष्टीच्या नाशासाठीं रुद्र झाला, इति प्रजासु सततं उद्भवस्थितिलयाः यतः भवन्ति—याप्रमाणें या निमित्तभूत ब्रह्मादिकांच्या योगानें प्रजांमध्यें सतत उत्पत्ति-स्थिति-लय होतात, सः आद्यः पुरुषः—तो आद्य पुरुष होय. [येथील आदिकर्ता या पदानें पुढील दुसरा कर्ताहि सुचविला आहे, तो प्रदर्शित करण्यासाठीं गुणावतारांच्या द्वारां चराचर सृष्ट्यादिकांचें कर्तृत्व पांचव्या श्लोकांत सांगितलें आहे. ज्याच्या रजोगुणानें जगदुत्पत्तीसाठीं ब्रह्मा, सत्त्वगुणानें स्थितिसाठीं विष्णु, तोच कर्मफलदाता आणि ब्राह्मण व धर्म यांचा पालक आहे आणि ज्याच्या तमानें सृष्टीच्या लयासाठीं रुद्र झाला, याप्रमाणें या निमित्तभूत ब्रह्मादिकांच्या योगानें ज्याच्यापासून प्रजांतील उत्पत्ति, स्थिति व लय होतात, तो आद्य पुरुष होय.] ५.

सर्व त्रैलोक्य हेंच ज्याचें शरीर आहे व ज्याच्यायोगानें सर्व देही आपापल्या ठिकाणीं व्यवहार करितात, ४९ ज्याच्या इंद्रियविकारांनीं ब्रह्मादि जीवांची ज्ञानकर्मेंद्रियें आपापलीं कर्में करितात, ५० जो जगाच्या नेत्रांचा नेत्र, घ्राणांचें घ्राण, श्रवणांचें श्रवण, रसनेची रसना, ५१ हातांचा हात, पायांचा पाय, वाणीचा वाक्, याप्रमाणें प्राण्यांच्या दोन्ही प्रकारच्या इंद्रियांत ज्याचीं इंद्रियें आहेत, ५२ जीवांचें ज्ञानहि ज्याच्या ज्ञानानें आहे व ज्याला ज्ञानदाता दुसरा कोणी नाहीं, जो स्वतःच ज्ञानघन आहे, ५३ ज्याच्या प्राणानें जगाचा प्राण आपला व्यापार करितो, ज्याच्या योगानें सर्व जगाला शारीरबल व मानसबल प्राप्त झालें आहे, ज्याच्यामुळें जगाचा सर्व व्यवहार चालतो,५४ उत्पत्ति, स्थिति व प्रलय या प्रसंगीं जो रज, सत्त्व व तम या गुणांनीं युक्त होतो, तोच आदिकर्ता भगवान् पुरुषावतार आहे, असें तूं जाण. ५५ राजा, सत्त्वादि त्रिगुणावस्थेनें तोच उत्पत्ति, स्थिति लयकर्ता होतो. हीच गुणावतारकथा मी आतां तुला सांगतों. ५६ प्रथमकल्पांत रजोगुणानें राजसी शक्ति धारण करून सृष्टीसाठीं तो स्वतः शतधृति झाला. त्याला ब्रह्मा म्हणतात. ५७ तो आपल्या राजसशक्तीनें सृष्टिकर्ता बनला. त्या सृष्टीचें व स्वधर्मस्थितीचें परिपालन करण्यासाठीं सत्त्वगुणानें तोच श्रीविष्णु झाला. ५८ तो द्विजधर्मांचा पालक व यज्ञभोक्ता श्रीविष्णु धर्माचा ऱ्हास झाला आहे असें पहातांच अनेक अवतार घेऊन भूलोकीं येतो व धर्माची स्थापना करितो. ५९ सृष्टीचा नियतकाल संपला असतां तामसशक्तीनें

शक्ती । स्वयें जाहला 'रुद्रमूर्ती' । सकळ कल्पांतीं निर्दाळितू ॥ ६० ॥ जो शेताची पेरणी करी । तोचि राखे देखे सोंकणी । तोचि वाळलियावरी । संवगणी करी सर्वांची ॥ ६१ ॥ तेवीं उत्पत्तिकाळीं तोचि ब्रह्मा । स्थितिकाळीं तोचि विष्णुनामा । प्रळयकाळींही रुद्रप्रेमा । ये पुरुषोत्तमा तेंचि नामें ॥ ६२ ॥ यालागीं तो आदिकर्ता । श्रुतिशास्त्रीं दृढ वार्ता । दक्ष-कश्यपादिकां कर्तव्यता । त्यांसी समर्थता याचेनी ॥ ६३ ॥ यापरी विचारितां । हाचि एक सकळ कर्ता । यावांचून कर्तव्यता । अणुमात्रता नव्हे आना ॥ ६४ ॥ जो सृष्टीपूर्वी स्वयंभ असे । जेणें उत्पत्ति-स्थिति-प्रळयो भासे । तोचि आदिकर्ता अनायासें । तोचि निजांशें पुरुषावतारू ॥ ६५ ॥ ऐक राया अतिविचित्र । जें परिसतां पुण्य पवित्र । तो नारायणाचा अवतार । ज्याचें चरित्र अलौलिक ॥ ६६ ॥

धर्मस्य दक्षदुहितर्यजनिष्ट मूर्त्यां नारायणो नर ऋषिप्रवरः प्रशान्तः ।
नैष्कर्म्यलक्षणमुवाच चचार कर्म योऽद्यापि चास्त ऋषिवर्यनिषेविताङ्घ्रिः ॥ ६ ॥

जो अजन्मा नित्य त्रिभुवनीं । जो न जन्मोनि जन्मला योनीं । तेणें धर्माची धर्मपत्नी । केली जननी दक्षकन्या मूर्ती ॥ ६७ ॥ ते मूर्तिमातेच्या उदरीं । नरनारायण अवतारी । एकचि दोंरूपेंकरी । धर्माच्या घरीं अवतरले ॥ ६८ ॥ तेणें नारदादिकांसी जाण । निरूपिलें नैष्कर्म्यलक्षण । स्वयें आचरलें आपण । तें कथन ऐक राया ॥ ६९ ॥ नारायण म्हणसी कोणे देशीं । तो बदरिकाश्रमीं आश्रमवासी । नारद सनकादिक ऋषी । अद्यापि त्यापासीं सेवेसी असती ॥ ७० ॥ त्यासी स्वरूपाचें लक्ष । सहजीं

स्वतः रुद्रमूर्ति होऊन कल्पांतीं संहार करितो. ६० जो शेतकरी शेत पेरितो, तोच त्याचें रक्षण करितो व शेवटीं शेत वाळल्यावर तें सर्व कापून टाकितो. ६१ त्याच न्यायानें उत्पत्तिकालीं तोच ब्रह्मा, स्थितिकालीं तोच विष्णु व प्रलयकालीं तोच पुरुषोत्तम रुद्र होतो. ६२ म्हणूनच वेदशास्त्रादिकांत त्याला आदिकर्ता म्हटलें आहे. दक्ष, कश्यप इत्यादि प्रजापतींना याच्याच सामर्थ्यानें प्रजाकर्तृत्व आहे. ६३ याप्रमाणें विचार केला असतां हाच एक सकलकर्ता आहे. याच्यावांचून दुसऱ्या कोणाला अणुमात्र कर्तव्यता नाहीं. ६४ जो सृष्टीच्यापूर्वी स्वयंप्रकाश होता व ज्याच्यामुळें उत्पत्ति-स्थिति-प्रलय भासतात, तोच आदिकर्ता असून निजांशानें तोच पुरुषावतार होय. ६५ राजा, मी तुला आतां आश्चर्यकारक नारायणावतार सांगतों. त्याचें चरित्र विचित्र आहे व तें ऐकण्यास अति पवित्र व पुण्यकारक आहे. ६६.

—नारायणअवतार सांगतात—

धर्मस्य दक्षदुहितरि मूर्त्यां—धर्माची धर्मपत्नी अशी जी दक्षकन्या मूर्ति तिच्या ठिकाणीं, प्रशान्तः ऋषिप्रवरः नारायणः नरः अजनिष्ट—अतिशय शान्त ऋषिश्रेष्ठ नारायण व नर अशा मूर्तिद्वयानें उत्पन्न झाला. नैष्कर्म्यलक्षणं कर्म उवाच चचार च—त्यानें नैष्कर्म्यलक्षण कर्म नारदादिकांना सांगितलें व स्वतः केलें. यः ऋषिवर्यनिषेविताङ्घ्रिः अद्यापि आस्ते—श्रेष्ठ ऋषींनीं ज्याच्या चरणाचें सेवन केलें आहे, असा होत्साता जो अद्यापि कर्माचरण करीत राहिला आहे. [धर्माची भार्या अशी जी दक्षकन्या मूर्ति तिच्या ठिकाणीं तो भगवान् नारायण व नर या दोन मूर्तींनीं प्रशान्त ऋषिश्रेष्ठ झाला. त्याचें चरित्र सांगतात—नैष्कर्म्य म्ह० आत्मस्वरूप ज्यानें लक्षित होतें तें नैष्कर्म्यलक्षणकर्म त्यानें नारदादिकांस सांगितलें व स्वतः आचरिलें. जो अद्यापीहि ऋषींनीं ज्याच्या चरणांची सेवा केली आहे असा होत्साता कर्माचरण करीत राहिला आहे.] ६.

जो नित्य अज असल्यामुळें या त्रिभुवनांत वस्तुतः न जन्मतांच देहवान् असल्याप्रमाणें भासणारा भगवान् त्यानें धर्माची धर्मपत्नी जी मूर्तिसंज्ञक दक्षकन्या तिला आपली जननी केली. ६७ त्या मूर्तिमातेच्या उदरीं नर-नारायणांचा अवतार झाला. तो एकच दोन रूपें धारण करून धर्माच्या घरीं अवतरला. ६८ त्यानें नैष्कर्म्यलक्षण नारदादिकांना सांगितलें व स्वतः आचरिलें. राजा, तूं आतां तीच कथा ऐक. ६९ तो नारायण कोठें आहे म्हणून विचारशील, तर सांगतों. तो बदरिकाश्रमांतील आपल्या आश्रमांत रहातो. नारद, सनकादिक इत्यादि ऋषि अद्यापि त्याच्यापाशीं सेवेला असतात. ७० त्याला स्वरूपाचें भान सहजच साक्षात असतें, त्यामुळें तो त्या स्वरूपनिष्ठेचा

असे प्रत्यक्ष । ते स्वरूपनिष्ठेचा पक्ष । अलक्ष्याचें लक्ष्य प्रबोधी स्वयें ॥ ७१ ॥ तया स्वरूपाचा निजबोध । स्वयें पावावया विशद । अद्यापवरी ऋषिवृंद । नित्य संवाद करिताती त्यासीं ॥ ७२ ॥ जें स्वरूप लक्षेना जनीं । तें विशद करूनि दे वचनीं । तेंचि अनुग्रहेंकरूनी । अनुभवा आणी तत्काळ ॥ ७३ ॥ ज्ञाते बहुसाल ऋषीश्वर । त्यांमाजीं नारायणअवतार । तेथ वर्तलें जें चरित्र । अतिविचित्र ऐक राया ॥ ७४ ॥

इन्द्रो विशङ्क्य मम धाम जिघृक्षतीति कामं न्ययुङ्क्त सगणं स बदर्युपाख्यम् ।
गत्वाऽप्सरोगणवसन्तसुमन्दवातैः स्त्रीप्रेक्षणेषुभिरविध्यदतन्महिज्ञः ॥ ७ ॥

ऐसा नारायणाचा प्रताप । देखोनि निष्ठा दृढ तप । तेणें इंद्रासी आला कंप । म्हणे स्वर्ग निष्पाप घेईल माझा ॥ ७५ ॥ त्याचें तप देखोनि परम । म्हणे गेलें गेलें स्वर्गधाम । इंद्रें कोपें प्रेरिला काम । अप्सरासंभ्रम-समवेत ॥ ७६ ॥ कामसमवेत अप्सरा । सवें वसंतही दुसरा । क्रोधु अवघियां पुढारा । जो तापसांतें पुरा नागवी सदा ॥ ७७ ॥ तीर्थतीर्थीचें अनुष्ठान । क्षमा नुपजे अंतःकरण । कोपु येतांच जाण । करी उगाणा तपाचा ॥ ७८ ॥ क्रोधु तापसांचा उघड वैरी । तापसां नागवी नानापरी । तोहि नारायणावरी । अवघ्यां अग्रीं चालिला ॥ ७९ ॥ ऐशीं मिळोनि बिरुदायितें । आलीं बदरिकाश्रमा समस्तें । नारायणु तप करी

पक्ष म्ह० अलक्ष्याचें लक्ष्य तो स्वतः उपदेशितो. ७१ त्या स्वरूपाचा अनुभव स्वतः साक्षात् घ्यावा, म्हणून ऋषींचे समूह त्याच्यापाशीं अद्यापि नित्य संवाद करितात. ७२ जें स्वरूप व्यवहारांत कोणाच्याहि प्रत्ययास येत नाहीं तेंच तो आपल्या वचनांनीं विशद करून सांगतो व अनुग्रहानें तत्काल अनुभवास आणून देतो. ७३ ज्ञाते ऋषीश्वर पुष्कळ आहेत. त्यांतीलच एक हा नारायणावतार आहे. त्या अवतारांत जें अति विचित्र चरित्र घडलें, तें तूं ऐक. ७४.

—आतां या पुढील दहा श्लोकांनीं दुमिल त्या नारायणाचा भगवदावतारत्वद्योतक परमोपशम दाखविण्यासाठीं इतिहास सांगतो—

मम धाम जिघृक्षति इति विशङ्क्य—हा तपानें माझें स्थान घेण्याची इच्छा करीत आहे, अशी शंका मनांत आणून, इंद्रः—देवेंद्र, सगणं कामं न्ययुङ्क्त—त्याच्या तपाचा भंग करण्यासाठीं परिवारासह कामाला प्रेरणा करिता झाला. अतन्महिज्ञः सः बदर्युपाख्यं-त्याचा महिमा न जाणणारा तो काम बोरींच्या झाडावरून ज्याच्या आश्रमाचें नांव रूढ झालें आहे अशा त्याच्या बदर्याख्य आश्रमास, अप्सरोगणवसन्तसुमन्दवातैः सह गत्वा—अप्सरांचा समूह, वसंत, अतिमंद वायु यांस जाऊन, स्त्रीप्रेक्षणेषुभिः अविध्यत्—स्त्रियांचे कटाक्ष याच बाणांनीं त्याला वेध करिता झाला. [हा नारायण तपाच्या योगानें माझें इंद्रपद मिळविण्याची इच्छा करीत आहे, असें विनाकारण समजून त्याच्या तपाचा नाश करण्यासाठीं इंद्र कामाला त्याच्या परिवारासह पाठविता झाला. तेव्हां नारायणाचा प्रभाव न जाणणारा तो कामहि त्याच्या बदरि-आश्रमास अप्सरादिकांसह जाऊन याच कटाक्ष बाणांनीं त्याला वेध करिता झाला.] ७.

असा नारायणाचा प्रताप, निष्ठा व दृढ तप पाहून इंद्राला कंप सुटला. तो म्हणाला— हा निष्पाप नारायण माझा स्वर्ग घेईल ! ७५ त्याचें तें दुष्कर तप पाहून 'गेलें गेलें, माझें स्वर्गस्थान गेलें' असें त्याला वाटलें व कोपानें अप्सरांच्या समूहासह त्यानें कामाला प्रेरणा केली. ७६ तेव्हां कामदेव अनेक अप्सरा, त्यांच्याबरोबर दुसरा वसंत आणि सर्व तपस्व्यांना सर्वदा पुरता नागविणारा, या सर्वांचा पुढारी, क्रोध यांना बरोबर घेऊन, नारायणाच्या बदरिका-श्रमास चालला. ७७ निरनिराळ्या तीर्थांमध्यें केलेलें अनुष्ठान अंतःकरणांत क्षमा न उपजल्यास व्यर्थ होतें व कोप येतांच सर्व तपाचा नाश होतो. ७८ त्यांतील क्रोध हा तापसांचा उघड वैरी आहे. तो तापसांची अनेक प्रकारें हानि करीत असतो. तोहि सर्वांच्या पुढें नारायणावर चालला. ७९ अशीं हीं सर्व मिळून नारायणाला वश करण्याचा विडा

जेथें । उठावलीं तेथें अतिआक्रमेंसीं ॥ ८० ॥ वसंतें शृंगारिलें वन । कोकिळा कलिरवें गायन । सुगंध शीतळ झळके पवन । पराग संपूर्ण वरुषती सुमनें ॥ ८१ ॥ तेथ भ्रमरांचे झणत्कार । कामिनीगायन कामाकार । हावभाव कटाक्षविकार । कामसंचार चेतविती ॥ ८२ ॥ नव्हेचि कामिनीकामबाधा । पराक्रमु न चलेचि क्रोधा । तोही सांडोनियां बिरुदा । परतला नुसधा म्लानवदनें ॥ ८३ ॥ मग मदनें मांडूनिया ठाण । विंधी कामिनीकटाक्षबाण । तेणें घायें नारायण । अणुप्रमाण न डंडळेचि ॥ ८४ ॥ शस्त्रें तोडितां आकाशासी । आकाश स्वयें सावकाशी । तेवीं कामें छळितां नारायणासी । तो निजसंतोषीं निर्द्वंद्व ॥ ८५ ॥ अंगीं निजतेजसत्ता । अग्नितेज प्राशूं जातां । तोंड जळे चवी चाखितां । तेवीं कामिनीकामना नारायणदृष्टीं ॥ ८६ ॥ नेणतां नारायणमहिमे । धांवोनि घाला घातला कामें । तेव्हां अवघींच पराक्रमें । स्वनिंद्यकर्में लाजलीं ॥ ८७ ॥ तेथ अवघीं झालीं पराङ्मुखें । पाठमोरीं निघालीं अधोमुखें । तेव्हां त्यांची गती निःशेखें । नारायणें देख खुंटली ॥ ८८ ॥ इंद्रियनियंता नारायण । नेणोनि छळूं गेलीं आपण । त्यापुढतीं पुनरागमन । सर्वथा जाण करवेना ॥ ८९ ॥ मागें न निघवे निश्चितें । ऐसें जाणोनि समस्तें । थोर गजबजिलीं तेथें । भयचकितें व्याकुळें ॥ ९० ॥ जाणोनि नारायणप्रताप । आतां कोपून देईल शाप । येणें धाकें म्लानरूप । अतिसकंप भयभीतें ॥ ९१ ॥ ऐशी देखोनि त्यांची स्थिती । कृपेनें तुष्टला कृपामूर्ती । अनुमात्र कोपु नये चित्तीं । अभिनव शांती नारायणाची ॥ ९२ ॥

उचलून बदरिकाश्रमास आलीं आणि नारायण जेथें तप करीत होता, तेथें एकाएकीं मोठ्या समारंभानीं प्रकट झालीं. ८० वसंतानें त्या वनाला शृंगारिलें, कोकिळा मंजुळ शब्दानें गायन करूं लागल्या, वायु मंद, सुगंध व शीतल वाहूं लागला, वृक्ष परागांनीं परिपूर्ण अशा पुष्पांचा वर्षाव करूं लागले. ८१ तेथें भ्रमरांचा गुंजारव ऐकूं येऊं लागला, अप्सरा कामोद्दीपक गायन करूं लागल्या, हावभाव व नेत्रकटाक्ष यांनीं त्या कामविकारांना उद्दीपित करूं लागल्या, ८२ पण नारायणाला कामाची बाधा होईना. त्याच्यापुढें क्रोधाचाहि कांहीं पराक्रम चालेना, म्हणून तो क्रोध म्लानमुख होऊन व आपलें बिरुद सोडून मुकाट्यानें परतला. ८३ तेव्हां मदनानें वीरासन ठोकून नारायणाला कामिनी-कटाक्षरूप बाणांनीं वेध केला. पण तो मुनि त्या बाणांच्या घावानें मनांत यत्किंचित्‌हि डळमळला नाहीं. ८४ शस्त्रानें आकाशाला तोडूं लागलें असतां त्याचा अवकाश जसा अविच्छिन्न रहातो, त्याचा छेद होत नाहीं, त्याप्रमाणें कामानें नारायणाला असें परोपरीनें छळलें असतांहि तो आपल्या आत्मसंतोषांत निर्विकार स्थिर राहिला. ८५ एखादा मनुष्य अभिमानानें स्वतः अग्नीला खाऊं लागल्यास त्याचें तोंड जसें जळतें, त्याप्रमाणें नारायणाच्या दृष्टीनें कामिनींची कामना होरपळून गेली. ८६ नारायणाचा महिमा न जाणतां कामानें त्याच्यावर धांवून घाला घातला; पण तो व त्याचा परिवार या सर्वांचे पराक्रम फुकट गेल्यामुळें आपल्या निंद्य कर्मांनीं ते सर्व मनांतल्यामनांत लाजले ८७ व सर्व परिवारासह काम खालीं मान घालून परतला. तीं सर्व इंद्राकडे जाऊं लागलीं; पण नारायणानें त्यांची गति कुंठित केली. ८८ नारायण हा सर्व इंद्रियांचा नियंता आहे, हें न जाणून तीं सर्व त्याला छळावयास त्याच्या-पुढें आपण होऊन गेलीं, पण तेथून परत फिरण्याचें मात्र त्यांच्या स्वाधीन राहिलें नाहीं. ८९ आपल्याला स्वस्थानीं परत जातां येत नाहीं असें जाणून तीं सर्व अतिशय गडबडलीं व मनांत आश्चर्यचकित होऊन भयानें व्याकुळ झालीं. ९० नारायणाचा प्रताप त्यांना कळलेला असल्यामुळें हा आपल्याला रागावून शाप देईल, या भीतीनें त्यांचीं मुखें कोमेजलीं. शरीरें कांपूं लागलीं. ९१ तेव्हां त्यांची ही अवस्था पाहून कृपामूर्ति नारायणाला त्यांची दया आली. त्याच्या मनांत त्यांच्याविषयीं अणुमात्रहि क्रोध आला नाहीं; उलट तो त्यांच्यावर संतुष्ट झाला. खरोखर त्याची शान्ति अपूर्व होती. ९२.

विज्ञाय शक्रकृतमक्रममादिदेवः प्राह प्रहस्य गतविस्मय एजमानान् ।
मा भैष्ट भो मदन मारुत देववध्वो गृह्णीत नो बलिमशून्यमिमं कुरुध्वम् ॥ ८ ॥

इंद्रें केला अपराध । तरी नारायणासी न येचि क्रोध । बापु निजशांती अगाध । न मनी विरुद्ध कामादिकांचें ॥ ९३ ॥ न येचि कामादिकांवरी कोप । इंद्रासही नेदीच शाप । नारायणाच्या ठायीं अल्प । कदा विकल्प नुपजेची ॥ ९४ ॥ अपकाऱ्यावरी जो कोपला । तो तत्काळ कोपें नागविला । अपकाऱ्या जेणें उपकार केला । तोचि दादुला परमार्थी ॥ ९५ ॥ अपकाऱ्यां उपकार करिती । त्याचि नांव गा परम शांती । ते शांतीची निजस्थिती । दावी लोकांप्रती आचरोनी ॥ ९६ ॥ परमार्थाची मुख्यत्वें स्थिती । पाहिजे गा परम शांती । ते शांतीची उत्कट गती । दावी लोकांप्रती आचरोनी ॥ ९७ ॥ भयभीत कामादिक । अप्सरोगण साशंक । त्यातें अभयदानें सुख । देऊनियां देव नारायण बोले ॥ ९८ ॥ अहो कामवसंतादिक स्वामी । कृपा करून आलेत तुम्ही । तुमचेनि पदाभिगमीं । आश्रमभूमी पुनीत झाली ॥ ९९ ॥ तुमचें झालिया आगमन । अवश्य करावें आम्ही पूजन । हेंचि आमुचें अनुष्ठान । कांहीं बळिदान अंगीकारा माझें ॥ १०० ॥ अवो अप्सरा देवकांता । तुम्ही भेवों नका सर्वथा । येथ आलिया समस्ता । पूज्य सर्वथा तुम्ही मज ॥ १ ॥ आश्रमा आलिया अतिथी । जे कोणी पूजा न करिती । त्यांची शून्य पुण्यसंपत्ती । आश्रमस्थिती शून्य होय ॥ २ ॥ तुम्ही नांगीकारितां पूजन । कांहीं न घेतां बळिदान । गेल्या हा आश्रम होईल शून्य । यालागीं कृपा करून पूजा घ्यावी ॥ ३ ॥ आश्रमा आलिया

आदिदेवः शक्रकृतं अक्रमं विज्ञाय—तो आदिदेव नारायण हा इंद्रकृत अपराध आहे असें जाणून **गतविस्मयः प्रहस्य एजमानान् प्राह**—गर्वरहित होत्साता हंसून शापाच्या भीतीनें कांपणाऱ्या त्यांस म्हणाला—**भो मदन मारुत देववध्वः**—हे मदना, हे वायो, अहो अप्सरांनो, **मा भैष्ट**—भिऊं नका. **न बलिं गृह्णीत**—आमचें आतिथ्य स्वीकारा. **इमं अशून्यं कुरुध्वं**—आमच्या या अश्रामाला अशून्य करा. [हें सर्व इंद्राचें कारस्थान आहे, असें जाणून तो आदिदेव आपल्या मनांत हंसला आणि आपण यांच्या मोहांत सांपडलों नाहीं तेव्हां आपण केवढे धीर आहों अशा गर्वानें रहित असलेला तो शापाच्या भीतीनें कांपणाऱ्या त्या सर्वांस मोठ्या आदरानें म्हणाला, —हे समर्थ मदना, हे वायो आणि अहो सुंदर देवास्त्रियांनो भिऊं नका. माझ्या आतिथ्याचा स्वीकार करा. आतिथ्याच्या अभावीं हा आश्रम शून्य असल्यासारिखा होईल. यास्तव या आमच्या आश्रमाला शून्य करूं नका, अशी मी तुमची प्रार्थना करितों.] ८.

इंद्रानें जरी अपराध केला तरी नारायणाला क्रोध आला नाहीं. त्याची शांति मोठी विलक्षण खरी ! त्यानें आपल्या मनांत कामादिकांचें अनिष्ट चिंतिलें नाहीं, ९३ त्याला कामादिकांचा क्रोध आला नाहीं व त्यानें इंद्रालाहि शाप दिला नाहीं. त्याच्या मनांत यत्किंचित्‌हि विकल्प आला नाहीं. ९४ अपकार करणारांवर जो रागावतो त्याचा तत्काळ नाश होतो, पण अपकार करणारावर जो उपकार करितो तोच परमार्थांमध्यें समर्थ होय. ९५ आपल्या शत्रूंवरहि उपकार करणें यालाच परम शान्ति म्हणतात. नारायण तीच परम शान्ति लोकांना स्वतः आचरून दाखविता झाला. ९६ मुख्य परमार्थाची सिद्धि होण्यास परम शान्ति पाहिजे. त्या शांतीचीच परम स्थिति नारायणानें लोकांना आचरून दाखविली. ९७ काम, क्रोध व अप्सरा हीं सर्व मनांत साशंक व भयभीत झालीं होतीं. त्यांस अभयदानानें सुखी करून तो म्हणाला. ९८ "अहो श्रेष्ठ कामवसंतादिकहो, तुम्ही कृपा करून आलेत. तुमच्या चरणधुळीनें आमची आमश्रभूमि पावन झाली. ९९ तुमचें आगमन झालें आहे, तेव्हां तुमचें पूजन आम्हीं अवश्य केलें पाहिजे. हेंच आमचें अनुष्ठान आहे. आमच्या आदरातिथ्याचा थोडासा स्वीकार करा. १०० अहो देवस्त्रियांनो—अप्सरांनो, तुम्ही अगदीं भिऊं नका. येथें आलेलीं तुम्ही सर्व आम्हांला पूज्यच आहांत. १ आपल्या घरीं आलेल्या अतिथींची जो कोणी पूजा करीत नाहीं, त्याचें सर्व पुण्य, संपत्ति व आश्रमस्थिति हीं सर्व नाहींशीं होतात. २ तुम्हीं जर माझ्या पूजेचा व उपहारादिकांचा स्वीकार न करितां गेलांत तर आमचा आश्रम शून्य होईल. यासाठीं कृपा करून आमच्या पूजेचा स्वीकार करा. ३ आश्रमांत आलेले अतिथि सर्वांना सर्वप्रकारें पूज्य आहेत. ज्या आश्रमांत

अतिथी । तो पूज्य सर्वांस सर्वार्थीं । अतिथी आश्रमीं जे पूजिती । ते आश्रमकीर्ती शिव वानी ॥ ४ ॥ व्याही रुसलिया पायां पडती । तेवीं विमुख जातां अतिथी । जे वंदोनियां सुखी करिती । ते सुख पावती स्वानंदें ॥ ५ ॥ व्याही रुसलिया कन्या न धाडी । अतिथी रुसलिया पुण्यकोडी । पूर्वापर जे कां जोडी । तेही रोकडी क्षयो पावे ॥ ६ ॥ वैकुंठीं ज्याची निजस्थिती । तो त्या आश्रमा ये नित्य वस्ती । जे आश्रमीं अतिथी । पूजिती प्रीतीं ब्रह्मात्मभावें ॥ ७ ॥ ऐसें बोलिला तयांप्रती । परी माझी हे अगाध शांती । हेही नारायणाचे चित्तीं । गर्व स्थिती असेना ॥ ८ ॥ ऐक राया अतिअपूर्व । असोनि निजशांतिअनुभव । ज्याच्या ठायीं नाहीं गर्व । तोचि देवाधिदेव निश्चयेंसीं ॥ ९ ॥ जो नित्य नाचवी सुरनरांसी । ज्या भेणें तप सांडिजे तापसीं । त्या अभय देवोनि कामक्रोधांसी । आपणांपासीं राहविलीं ॥ ११० ॥

इत्थं ब्रुवत्यभयदे नरदेव देवाः सव्रीडनम्रशिरसः सघृणं तमूचुः ।
नैतद्विभो त्वयि परेऽविकृते विचित्रं स्वाराममधीरनिकायनतपादपद्मे ॥ ९ ॥

एवं अभय देत नारायण । स्वमुखें बोलिला आपण । तेणें कामादि अप्सरागण । लाज विरोन अधोमुख झालीं ॥ ११ ॥ देखोनि निर्विकार पूर्ण क्षमा । श्रीनारायण हा परमात्मा । कळों सरलें वसंतादि कामा । त्याचाचि महिमा वर्णिती स्वयें ॥ १२ ॥ ऐकें नरदेवचक्रवर्ती । विदेहा सार्वभौमा भूपती । त्या नारायणाची निजस्तुती । कामादि करिती सद्भावेंसीं ॥ १३ ॥ जे सदा सर्वांतें छळिती । त्यांहीं देखिली पूर्ण शांती । तेचि शांतीची स्तुति करिती । नारायणाप्रती कामक्रोध ॥ १४ ॥ जेणें संतोषे श्रीनारायण । त्यासी कृपा उपजे पूर्ण । ऐशिया परीचें स्तवन । मांडिलें संपूर्ण परमार्थबुद्धीं ॥ १५ ॥

अतिथींचा सत्कार करितात त्या आश्रमांची कीर्ति शिव वाखाणितो. ४ व्याही जर रुसला तर त्याच्या पायां पडून त्याचा रुसवा घालवितात, त्याप्रमाणें अतिथि परत जात असतां त्यास वंदन करून जे त्याचा सत्कार करितात, ते स्वानंदसुखाला प्राप्त होतात. ५ व्याही जर रुसला तर तो मुलीला माहेरीं धाडीत नाहीं, त्याप्रमाणें अतिथि रुसला तर अनेक जन्मांत ज्या पुण्यांच्या कोटि जोडलेल्या असतात, तें सर्व पुण्य क्षय पावतें. ६ ज्या आश्रमांत अतिथींची ब्रह्मात्मभावानें पूजा करितात, तेथें वैकुंठांत रहाणारा भगवान् नित्य वस्ती करितो " ७ असें तो त्यांना बोलला. परंतु माझी शान्ति अशी अगाध आहे, असा गर्व नारायणाच्या मनालाहि शिवला नाहीं. ८ हे राजा, अशी अपूर्व शान्ति असूनहि ज्याला त्याचा तीळभरहि गर्व नाहीं, तोच निश्चयानें देवाधिदेव जाणावा. ९ जो काम, देव व मनुष्य यांनाहि नित्य नाचवितो, ज्याच्या भीतीनें तापस आपल्या तपाला आंचवतात, त्या कामाला व त्याच्या साह्यकर्त्या क्रोधादिकांनाहि अभय देऊन नारायण त्यांना आपणापाशीं ठेवून घेता झाला. ११०.

नरदेव अभयदे इत्थं ब्रुवति (सति)-हे राजा जनका, अभय देणारा नारायण असें बोलत असतां, **सव्रीडनम्रशिरसः देवाः**-लज्जेनें ज्यांचीं मस्तकें नम्र झालीं आहेत असे देव, **सघृणं तं ऊचुः**-कृपायुक्त अशा त्याला म्हणाले, **विभो**-हे प्रभो, **परे अविकृते स्वाराममधीरनिकायनतपादपद्मे त्वयि एतत् विचित्रं न**-मायेहून पर, त्यामुळेंच निर्विकार, स्वरूपामध्येंच ज्याचा आराम आहे, जे धीर आहेत, अशा विद्वानांच्या समूहांनीं ज्याच्या चरणकमलांस वंदन केलें आहे अशा तुझ्या ठिकाणीं क्षुब्ध न होतां उलट दया करणें हें कांहीं आश्चर्य नाहीं. [हे राजा, अभय देणारा नारायण असें म्हणाला असतां कामादिक देव लाजले. त्यांनीं आपलीं तोंडें खालीं घातलीं व त्या दयाळु ईश्वराला ते म्हणाले--' हे प्रभो, मायेहून विलक्षण, निर्विकार व सर्व आत्मज्ञांना वंद्य अशा तूं आमच्यासारख्या अपराध्यावर क्रोध न करतां दया करावीस हें मोठेंसें आश्चर्यकारक नाहीं. '] ९.

याप्रमाणें नारायण त्यांना अभय देत स्वतः बोलला असतां कामादिक अप्सरांसह लज्जेनें खालीं मान घालून बसलीं. ११ श्रीनारायणाला निर्विकार व पूर्णक्षमायुक्त पाहून तो परमात्मा आहे असें काम-वसंतादिकांस कळून चुकलें व तीं स्वतः त्याचाच महिमा वर्णूं लागलीं. १२ हे चक्रवर्ति राजा, तीच कथा आतां ऐक. १३ जे नेहमी सर्वांचा छळ करणारे तेच काम-क्रोध नारायणाची पूर्ण शांति पाहून त्याच्या शांतीची स्तुति करूं लागले. १४ ज्यायोगें नारायण संतुष्ट होईल व त्याच्या मनांत पूर्ण कृपा उत्पन्न होईल अशा प्रकारचें स्तवन त्यांनीं परमा-

जयजय देवाधिदेवा । तुझिया अविकारभावा । पाहतां न देखों जी सर्वां । देवांमानवांमाझारीं ॥ १६ ॥ मज कामाचेनि घायें । ब्रह्मा कन्येसी धरूं जाये । पराशरा केलें काये । भोगिली पाहें दिवा दुर्गंधा ॥ १७ ॥ ज्यातें योगी वंदिती मुगुटीं । जो तापसांमाजीं धूर्जटी । तो शिवु लागे मोहिनीपाठीं । फिटोनि लंगोटी वीर्य द्रवलें ॥ १८ ॥ विष्णु वृंदेच्या श्मशानीं । धरणें बैसे विषयग्लानीं । अहल्येची काहणी । वेदीं पुराणीं वर्णिजे ॥ १९ ॥ नारदु नायके माझी गोष्टी । त्यासी जन्मले पुत्र साठी । माझी साहों शके काठी । ऐसा बळिया सृष्टीं असेना ॥ १२० ॥ जो ब्रह्मचाऱ्यांमाजीं राजा । हनुमंतु मिरवी पैजा । तयास्तव मकरध्वजा । संगेंविण बोजा जन्मविला म्यां ॥ २१ ॥ कलंकिया केला चंद्र । भगांकित केला इंद्र । कपाटीं घातला षण्मुख वीर । जो लाडका कुमर महेशाचा ॥ २२ ॥ मज मन्मथाचा यावा । न साहवे देवां दानवां । मा तेथ इतरां मानवां । कोण केवा साहावयासी ॥ २३ ॥ मज जाळिलें महेशें । त्यासी म्यां अनंगें केलें पिसें । नवल धारिष्ट तुझ्याऐसें । पाहतां न दिसे तिहीं लोकीं ॥ २४ ॥ त्या मज कामा न सरतें केलें । शांतीचें कल्याण पाहालें । हें तुवांचि एकें यश नेलें । स्वभावें जिंकिलें निजशांतीयोगें ॥ २५ ॥ तो मी न सरता केला काम । क्रोधा आणिला उपशम । वासनेचा संभ्रम । नित्य निर्भ्रम त्वां केला ॥ २६ ॥ हे नारायणा तुझी निष्ठा । न ये आणिकां तपोनिष्ठां । केला अनुभवाचा चोहटा । शांतीचा मोटा सुकाळु केला ॥ २७ ॥ मागें तपस्वी वाखाणिले । म्हणती कामक्रोधां जिंकिलें । त्यांसीही आम्हीं पूर्ण छळिलें । ऐक तें भलें सांगेन ॥ २८ ॥ कपिलाऐसा तेजोराशी । क्रोधें तत्काळ छळिलें त्यासी । शापु देतांचि सगरासी । तोही क्रोधासी वश्य झाला ॥ २९ ॥ कोपु आला नारदासी । वृक्ष केलें नलकुबरांसी । गौतमें अहल्येसी । कोपें वनवासी शीळा केली ॥ १३० ॥ जो सर्वदा विघ्नांतें

बुद्धीनें आरंभिलें. १५ हे देवाधिदेवा, तुझा जयजयकार असो. तुझा हा निर्विकार भाव सर्व देव व मानव यांतील कोणामध्येंच दिसत नाहीं. १६ मी जो काम त्या माझ्या व्यथेनें ब्रह्मा आपल्या कन्येला धरावयास गेला. पराशरानें दुर्गंधयुक्त मत्स्यगंधेचा दिवसां उपभोग घेतला. १७ अहो, ज्याच्या चरणांवर योगी लोटांगणें घालितात व जो सर्व तपस्व्यांमध्यें श्रेष्ठ तो शंकरहि जेव्हां मोहिनीच्या मागें लागला, तेव्हां त्याची कशी त्रेधा उडाली, हें पुराणांत प्रसिद्धच आहे. १८ विष्णु विषयांसाठीं व्याकुळ होऊन स्मशानांत वृंदेसाठीं धरणें धरून बसला. अहल्येचा कहाणी तर वेदांत व पुराणांत प्रसिद्धच आहे. १९ नारद माझी गोष्ट ऐकेना, पण त्याला साठ पुत्र झाले. तेव्हां माझा तडाखा सहन करील असा समर्थ या जगांत कोण आहे ? १२० ब्रह्मचाऱ्यांतील श्रेष्ठ हनुमान् मोठ्या पैजा मारीत होता, म्हणून मीं त्याच्यापासून मकरध्वजाला उत्पन्न करविलें, २१ चंद्राला कलंकित केलें, इंद्राला भगांकित केलें आणि शंकराचा जो लाडका पुत्र षडानन त्याला गुहेमध्यें बसविलें. २२ मज कामाचा पराक्रम देवांना व दानवांनाहि सहन झाला नाहीं. तेथें मानवांची काय कथा ! २३ महादेवानें मला जाळिलें पण मीं अंगरहित असूनहि त्याला वेडें केलें. तुझ्या सारखें आश्चर्यकारक धैर्य मला त्रैलोक्यांतहि कोठें दिसत नाहीं, २४ कारण अशा प्रभावशाली मज कामाचा तूं पराभव केलास व शांतीचें कल्याण उदयास आलें. खरोखर आपल्या शांतीनें स्वभावतःच कामाला जिंकिलें, २५ असें हें यश तूंच एकट्यानें मिळविलेंस. माझा पराभव करून तूं क्रोधालाहि शांत केलेंस. वासनेचा मोहहि तूं कायमचा घालविलास. २६ हे नारायणा, तुझी ही निष्ठा दुसऱ्या तपस्व्यांना साधत नाहीं. अनुभवाचा चव्हाटा करून तूं शांतीचा मोठा सुकाळ केला आहेस. २७ यापूर्वी लोकांकडून वाखाणले गेलेले अनेक तपस्वी झाले. त्यांनीं काम-क्रोधाला जिंकिलें असें म्हणतात. पण त्यांनाहि आम्हीं पुष्कळ छळिलें आहे. ती कथा आतां ऐक. २८ कपिलासारखा तेजस्वी, पण त्यालाहि क्रोधानें छळिलें. सागराला शाप देतांना तो क्रोधाच्या वश झाला. २९ नारदाला क्रोध आला व त्यानें कुबेराचा पुत्र जो नलकूबर त्याला वृक्ष बनविलें. गौतमानें क्रोधानें बिचाऱ्या अहल्येला वनामध्यें शिळा करून टाकिलें. १३० जो सर्वदा विघ्नहर्ता गणपति त्या विघ्नेशालाहि क्रोधानें

आकळी । त्या विघ्नेशातें क्रोध छळी । तेणें अतिकोपें कोपानळी । चंद्रासी तत्काळीं दिधला शाप ॥ ३१ ॥ कोपु आला दुर्वासासी । शाप दिधला अंबरीषासी । देवो आणिला गर्भवासासी । क्रोधें महाऋषी छळिले ऐसे ॥ ३२ ॥ जे दुजी सृष्टी करूं शकती । तेही कामक्रोधें झडपिजेती । सागरीं पडे इंद्रसंपत्ती । हे क्रोधाची ख्याती पुराणप्रसिद्ध ॥ ३३ ॥ इतरांची गोठी कायसी । क्रोधें छळिलें ईश्वरासी । तेणें दीक्षिता द्विजदक्षासी । शिरच्छेदासी करविता झाला ॥ ३४ ॥ जेथ मी काम स्वयें वसें । तेथ क्रोध वसे सावकाशें । काम क्रोध असतुचि नसे । नारायणा ऐसें तुवां केलें ॥ ३५ ॥ हें परमाद्भुत तुझें वीर्य । आणिकां एवढें नाहीं धैर्य । यालागीं तुझें परिचर्य । सदा मुनिवर्य सेविती चरण ॥ ३६ ॥ शांतीच्या चाडें देवाधिदेवा । जे नित्य करिती तुझी सेवा । ते कामक्रोधादि स्वभावा । स्मरतां तव नांवा जिंकिती सुखें ॥ ३७ ॥ जेथ सन्मानें काम पुरत । तेथ आदरें अनुग्रहो करित । काम सन्मानें जेथ अतृप्त । तेथें शाप देत अतिक्रोधें ॥ ३८ ॥ यालागीं शापानुग्रहसमर्थ । ते सर्वदा कामक्रोधयुक्त । परी नवल तुझें सत्वोचित । केले अंकित कामक्रोध ॥ ३९ ॥ मज गर्व नाहीं सर्वथा । हेही तुज नाहीं अहंता । छळवाद्यां द्यावी लघुता । अथवा उपेक्षता न करिसी ॥ १४० ॥ पृथ्वी दुःखी करिती नांगरीं । ते पिकोनि त्यांतें सुखी करी । तेवीं अपकाऱ्यां जो अपकारी । तो मोक्षाच्या शिरीं मुगुटू ॥ ४१ ॥ तुजमाजीं निर्विकार शांती । हें नवल नव्हे कृपामूर्ती । तुझ्या स्वरूपाची स्थिती । आजि निश्चिती कळली आम्हां ॥ ४२ ॥ तूं निर्गुण निरूपम । मायातीत पूर्णब्रह्म । तुझें स्वभावें स्मरतां नाम । सकामाही काम स्पर्शों न शके ॥ ४३ ॥ जो नित्य स्मरे तुझें नाम । त्यासी मी कामचि करी निष्काम । क्रोधचि करी क्रोधा शम । मोहो तो परम प्रबोध होय ॥ ४४ ॥ जे धीर वीर निजशांती । ज्यांसी परमानंदें नित्य तृप्ती । ऐशियांचिया अमित पंक्ती । पायां लागती

छळिलें व क्रोधाग्नीनें संतप्त झालेल्या त्यानें चंद्राला तत्काळ शाप दिला. ३१ दुर्वासाला कोप आला व त्यानें अंबरीषाला शाप दिला व देवाला गर्भवास घडला. याप्रमाणें क्रोधानें ब्रह्मर्षींना छळिलें. ३२ जे प्रतिसृष्टि करूं शकतात त्यांच्याहि काम-क्रोध झडप घालितात. इंद्राची संपत्ति समुद्रामध्यें पडली. अशी ही क्रोधाची ख्याति पुराणांतून प्रसिद्ध आहे. ३३ अहो, इतरांच्या गोष्टी कशाला हव्यात ! क्रोधानें ईश्वरालाहि छळिलें. त्यानें क्रोधवश होऊन दीक्षित दक्ष ब्राह्मणाचा वीरभद्राकडून शिरच्छेद करविला. ३४ जेथें मी रहातों तेथें क्रोधहि यथेष्ट वास करितो. पण हे नारायणा, तूं आम्हांला असून नाहींसें केलें आहेस. ३५ हें तुझें सामर्थ्य आश्चर्यकारक आहे. इतरांमध्यें एवढें धैर्य नसतें. म्हणूनच इतर मुनिवर्य वंद्य असलेल्या तुझ्या चरणाची सदा सेवा करितात. ३६ हे देवाधिदेवा, शांतीच्या इच्छेनें तुझी जे नित्य सेवा करितात ते तुझ्या नामस्मरणानें काम-क्रोधादि स्वभावांना अनायासानें जिंकितात. ३७ जेथें सन्मानानें काम म्ह० इच्छा पूर्ण होते तेथें तो आदरानें अनुग्रह करितो. जेथें सन्मामानें तो तृप्त होत नाहीं तेथें मोठ्या क्रोधानें तो शाप देतो. ३८ म्हणून जे शापानुग्रहसमर्थ असतात ते सर्वदा काम-क्रोधांनींहि युक्त असतात. पण तुझें मोठें नवल आहे. तुझ्या शांतीला उचित अशाच प्रकारें तूं कामक्रोधांस अंकित केलें आहेस. ३९ इतकें करूनहि 'मला गर्व नाहीं' असाहि तुला अभिमान नाहीं. आम्हां छळवाद्यांना तुच्छ लेखून तूं आमची उपेक्षाहि करीत नाहींस. ४० पृथ्वीला नांगरून जे दुःखी करितात त्यांना धान्यरूपानें पिकून ती सुखी करिते, त्याचप्रमाणें अपकारकर्त्यांवर जो उपकार करितो तो मोक्षाच्या शिरावरील मुकुट होय. ४१ तुझ्यामध्यें निर्विकार शांति असणें हें कांहीं मोठेंसें आश्चर्य नाहीं. ४२ हे कृपासागरा, आज आम्हांला तुझ्या स्वरूपाची स्थिति निश्चित कळली. ४३ तूं निर्गुण, निरूपम, मायातीत, पूर्णब्रह्म आहेस. तुझ्या नांवाचें स्वभावतःच स्मरण केलें असतां सकाम पुरुषालाहि काम स्पर्श करूं शकत नाहीं. तुझें नांव जो नित्य स्मरतो, त्याला मी कामच निष्काम करितों. क्रोधच त्याच्या क्रोधाचा उपशम करितो आणि मोह परमप्रबोध म्ह० ज्ञान होतो. ४४ जे शांतीनें धीर व वीर असतात, ज्यांची परमानंदानें नित्य तृप्ति झालेली असते, अशा मुक्तांच्याहि असंख्य पंक्ति तुझ्या पायीं लोटांगणें घालितात. ४५ तुला

तुझिया ॥ ४५ ॥ तुज करावया नमस्कारु । पुढें सरसे महासिद्धांचा संभारु । त्यांसही न लभे अवसरु । तूं परात्परु परमात्मा ॥ ४६ ॥ तुझिया सेवकांकडे । विघ्न रिघतां होय बापुडें । तें रिघावया तुजपुढें । कोण्या परिपाडें रिघेल ॥ ४७ ॥

त्वां सेवतां सुरकृता बहवोऽन्तरायाः स्वौको विलङ्घ्य परमं व्रजतां पदं ते ।
नान्यस्य बर्हिषि बलीन् ददतः स्वभागान् धत्ते पदं त्वमविता यदि विघ्नमूर्ध्नि ॥ १० ॥

तापसां बहु विघ्नअपावो । आम्हीं करावा अंतरावो । हा आमुचा निजस्वभावो । नव्हे नवलावो नारायणा ॥ ४८ ॥ हृदयींचा गुप्त करोनि काम । बाह्य जप तप भक्तिसंभ्रम । ऐसे जे कां शठ परम । विघ्नांचा आक्रम त्यांवरी चाले ॥ ४९ ॥ ते आमची विघ्नस्थिती । न चले तुझिया भक्तांप्रती । तूं रक्षिता भक्तपती । तेथें विघ्नांची गति पराङ्मुख सदा ॥ १५० ॥ माझियां निजभक्तांसी । विघ्नें कैंचीं म्हणसी त्यांसी । ऐक त्याही अभिप्रायासी । सांगेन तुजपासीं देवाधिदेवा ॥ ५१ ॥ पावावया निजपदातें । लाता हाणून स्वर्गभोगातें । जे नित्य निष्काम भजती तूतें । नाना विघ्नें त्यातें सुरवर रचिती ॥ ५२ ॥ उल्लंघूनियां आमुतें । हे पावती अच्युतपदातें । यालागीं सुरवर त्यांतें । अतिविघ्नांतें प्रेरिती ॥ ५३ ॥ बळी नेदूनि आम्हांसी । हे जाऊं पाहती पूर्णपदासी । येणें क्षोभें इंद्रादिक त्यांपासीं ।

नमस्कार करावयास महासिद्धांचा समुदाय पुढें सरसावतो. पण त्यांनाहि अवसर मिळत नाहीं. तूं परात्पर परमात्मा आहेस. ४६ तुझ्या सेवकापुढें यावयासहि विघ्न धजत नाहीं. मग तें तुझ्यापुढें कोणत्या तोंडानें येणार ! १४७.

—आणि अशा प्रकारचे अपराध करणें हा आमचा स्वभावच असल्यामुळें त्यांत कांहीं आश्चर्यहि नाहीं, असें काम म्हणतो—

त्वां सेवतां सुरकृताः बहवः अन्तरायाः भवन्ति—तुझी सेवा करणाऱ्यांना इंद्रादि देवांनीं उत्पन्न केलेलीं अनेक विघ्नें होतात. कारण, **स्वौको विलङ्घ्य**—आपल्या स्थानाचें उलंघन करून, ते **परमं पदं व्रजतां**—तुझ्या परमपदाला जाणाऱ्या भक्तांनाच ते विघ्न करितात. पण, **बर्हिषि स्वभागान् बलीन् ददतः अन्यस्य न**—शेतकरी जसे राजाला कर देतात, त्याप्रमाणें यज्ञांत पुरोडाशादि देवभाग इंद्रादिकांना देणाऱ्या व तुझी सेवा न करणाऱ्या दुसऱ्या कोणालाहि ते विघ्न करीत नाहींत. तर मग काय माझा भक्त विघ्नांनीं भ्रंश पावतो ! छे नाहीं. **यदि त्वं अविता**—जर तूं रक्षक असलास तर तुझा भक्त, **विघ्नमूर्ध्नि पदं धत्ते**—विघ्नांच्या मस्तकांवर पाय ठेवितो. [देवस्थानांचें उलंघन करून तुझ्या परम पदाला जाणाऱ्या तुझ्या भक्तांना देव अनेक विघ्नें करितात. कारण मनुष्यांनीं स्वर्गाचें उल्लंघन करून जाणें त्यांना इष्ट नसतें. पण शेतकरी जसे राजाला कर देतात त्याप्रमाणें यज्ञांत पुरोडाशादि देवभाग देणाऱ्या तुझ्या अभक्तांना ते विघ्न करीत नाहींत. ज्याअर्थीं तूं सर्व देवांचा अधिपति, आपल्या भक्तांचा रक्षक आहेस, त्याअर्थीं तुझा भक्त विघ्नांच्या मस्तकांवर पाय ठेवितो. तुझ्या भक्तांत जर एवढें सामर्थ्य येतें तर तुझ्याविषयीं विघ्नांची शंकाच कशाला पाहिजे ?] १०.

तापसांना अनेक प्रकारचीं विघ्नें करावीं हा आमचा स्वभावच आहे. हे नारायणा, म्हणून त्यांत कांहीं आश्चर्य नाहीं. ४८ हृदयांतील कामादि विकार लपवून ठेवून बाहेरून जप, तप व भक्तीचें अवडंबर करणारे जे मोठे लबाड ढोंगी असतात, त्यांवरच आमच्या विघ्नांचा प्रभाव चालतो, ४९ पण तुझ्या भक्तांपुढें आमच्या विघ्नांचें कांहीं चालत नाहीं. कारण तूं स्वतः ईश्वर त्यांचा रक्षण करणारा आहेस. तेथें विघ्नांची गति नेहमीं कुंठितच होते. १५० 'माझ्या भक्तांवर विघ्नें कसलीं येणार ' असें जर म्हणशील तर हे देवाधिदेवा, तेंहि सांगतों, ऐक. ५१ स्वर्गसुखाला लाथा मारून म्ह० तुच्छ लेखून जे भक्त तुझें पद प्राप्त होण्यासाठीं निष्काम भजन करितात, त्यांच्यासाठीं देव अनेक प्रकारचीं विघ्नें तयार करितात. ५२ आमचें उलंघन करून हे अच्युतपदाला प्राप्त होतील म्हणजे मुक्त होऊन परमात्मस्वरूप बनतील या भीतीनें देव त्यांच्या मार्गांत अनंत विघ्नें आणितात. ५३ आम्हांला आमचे हविर्भाग न देतां हे पूर्णत्वाला जाऊं पहातात, म्हणून इंद्रादि देवांचा क्षोभ होऊन ते अनेक विघ्नें त्यांकडे

नाना विघ्नांसी मोकलिती ॥ ५४ ॥ यालागीं त्याच्या भजनापासीं । विघ्नें छळूं धांवती आपैसीं । विघ्नीं अभिभव नव्हे त्यांसी । तूं हृषीकेशी रक्षिता ॥ ५५ ॥ सांडूनि सकाम कल्पना । जे रतले तुझ्या चरणा । त्यांस आठही प्रहर जाणा । तूं नारायणा रक्षिसी ॥ ५६ ॥ भक्त विघ्नीं होती कासाविसी । धांव धांव म्हणती हृषीकेशी । तेव्हां तूं धांवण्या धांवसी । निष्ठुर नव्हसी नारायणा ॥५७॥ विघ्न न येतां भक्तांपासीं । आधींच भक्त संरक्षणासी । तूं भक्तांचे चौपासीं । अहर्निशीं संरक्षिता ॥ ५८ ॥ विघ्न सळें धांवें सकोप । तंव विघ्नीं प्रगटे तुझें स्वरूप । यालागीं भक्तांसी अल्प । विघ्नप्रताप बाधूं न शके ॥ ५९ ॥ कामें छळावें हरि-भक्तांसी । तंव हरी कामाचा हृदयवासी । तेव्हां विघ्नचि निर्विघ्न त्यांसी । भय भक्तांसी स्वप्नीं नाहीं ॥ १६० ॥ विघ्न उपजवी विरोधु । तंव विरोधा सबाह्य गोविंदु । मग विरोध तोचि महाबोधु । स्वानंद-कंदु निजभक्तां ॥ ६१ ॥ ज्यासी तुझ्या चरणीं भावार्थु । त्यासी विघ्नीं प्रगटे परमार्थु । ऐसा भावबळें तूं समर्थु । साह्य सततु निजभक्तां ॥ ६२ ॥ यापरी समर्थ तूं संरक्षिता । ते जाणोनि विघ्नां समस्तां । पाय देऊनि इंद्रपदमाथां । पावती परमार्था तुझिया कृपें ॥ ६३ ॥ देवो संरक्षिता ज्यासी । विघ्नें छळूं धांवती त्यासी । मा सकामाची गती कायसी । विदेहा म्हणसी तें ऐक ॥ ६४ ॥ विषयकाम धरोनि मनीं । इंद्रादि देवां बळिपूजनीं । जे भजले यागयजनीं । देव त्यांलागोनी न करिती विघ्न ॥ ६५ ॥ इंद्र याज्ञिकांचा राजा । सकाम याज्ञिक त्याच्या प्रजा । यज्ञभाग अर्पिती वोजा । पावल्या बळिपूजा न करिती विघ्न ॥ ६६ ॥ म्हणसी कामादि विटंबिती । ते निष्कामा कदा नातळती । सहज कामा वश असती । सदा कर्मे करिती सकाम ॥ ६७ ॥ जे मज कामासी वश होती । ते तप वेंचोनि भोग भोगिती । जे आतुडले क्रोधाच्या हातीं । ते वृथा नागवती तपासी ॥ ६८ ॥

पाठवितात. ५४ यासाठीं विघ्नें आपण होऊनच त्यांना छळावयाला धांवतात. पण तूं हृषीकेश रक्षण करणारा असतां ते विघ्नांकडून पराभव पावत नाहींत. ५५ जे सकाम कल्पना सोडून तुझ्या चरणीं रत होतात, त्यांचें तूं नारायण आठहि प्रहर रक्षण करितोस. ५६ भक्त जेव्हां विघ्नानें कासावीस होतो, तेव्हां 'हे हृषीकेशा धांव' असा तो धांवा करितो. तेव्हां त्याच्या हांकेला तूं धांवून जातोस. कारण तूं निष्ठुर नाहींस. ५७ भक्तांजवळ विघ्न येण्याच्या आधींच तूं रात्रंदिवस त्यांचें चोहोंबाजूंनीं रक्षण करीत असतोस. ५८ विघ्न रागानें त्यांचा छळ करण्यास धांवं लागलें म्हणजे त्या विघ्नांतच तुझें स्वरूप प्रकट होतें; त्यामुळें तुझ्या भक्तांना विघ्नाचा प्रताप किंचितूहि बाधत नाहीं. ५९ काम जों हरिभक्तांना छळवयास जातो तों हरीच कामाच्या हृदयांत वास करितो. त्यामुळें तें विघ्नच निर्विघ्न होऊन तुझ्या भक्ताला स्वप्नांतहि त्याचें भय बाधत नाहीं. १६० विघ्न विरोध उत्पन्न करितें, पण गोविंद त्या विरोधाला अंतरबाह्य व्यापून रहातो; त्यामुळें विरोधच महाबोध बनतो. तो तुझ्या भक्ताला आनंदाचा कंदच वाटतो. ६१ तुझ्या चरणांवर ज्याचा भाव असतो त्याला विघ्नांतहि परमार्थ स्पष्ट दिसतो. याप्रमाणें आपल्या भक्तांच्या भावबळानें तूं समर्थ सतत त्यांचा साह्यकर्ता होतोस. ६२ तूं रक्षण करणारा समर्थ असल्यावर तुझे भक्त सर्व विघ्नांना जिंकून इंद्रपदावरहि पाय देऊन तुझ्या कृपेनें परमपदाला प्राप्त होतात. ६३ देव त्यांचें रक्षण करितो. अहोपण, देव ज्यांचा रक्षक असतो त्यांनाहि छळावयाला विघ्नें धांवतात. मग जे सकाम पुरुष असतात त्यांची गति काय विचारावी! असें म्हणशील तर हे राजा, ऐक. ६४ मनांत विषयांची इच्छा धरून जे इंद्रादि देवतांना हविर्भाग देतात, जे यज्ञ-यागादि करितात, त्यांना देव विघ्न करीत नाहींत. ६५ इंद्र यज्ञ करणारांचा आहे. कामना ठेवून यज्ञ करणारी सर्व त्याची प्रजा आहे. ते उत्तम यज्ञभाग त्याला अर्पितात आणि असे भाग मिळाल्यावर देव त्यांना विघ्न करीत नाहींत. ६६ आतां कामादिक त्याची विटंबना करितात म्हणून म्हणशील तर सांगतों. निष्काम पुरुषाच्या वाटेला ते कधींहि जात नाहींत. जे स्वभावतःच कामवश असतात व सर्वदा सकामकर्मे करितात ६७ व जे मज कामाच्या वश होतात ते तपाचा व्यय करून भोग भोगितात आणि जे क्रोधाच्या हातीं सांपडतात ते व्यर्थ आपल्या तपाला आंचवतात. १६८.

क्षुत्तृट्त्रिकालगुणमारुतजैव्ह्यशैश्न्यानस्मानपारजलधीनतितीर्य केचित् ।
क्रोधस्य यान्ति विफलस्य वशं पदे गोर्मज्जन्ति दुश्चरतपश्च वृथोत्सृजन्ति ।। ११ ।।

प्राणायामें प्राणापानीं । निजप्राणातें आकळोनी । वात वर्ष शीत उष्ण साहोनी । जे अनुष्ठानीं गुंतले ।। ६९ ।। क्षुधे तृषेतें नेमूनी । जिव्हा शिश्न आकळोनी । मज कामातें जिंतिलें मानूनी । निष्कामाभिमानी उन्मत्त ।। १७० ।। अल्प अपमानाहातीं । जे क्रोधासी वश होती । ते शाप देऊनि तपसंपत्ती । व्यर्थ नागविती निजनिष्ठा ।। ७१ ।। सकामाच्या अनुष्ठाना । मज कामसंगें स्रक्चंदना । भोग भोगिती स्वर्गांगना । अमृतपाना प्राशिती ।। ७२ ।। त्या मज कामातें उपेक्षिती । आणि क्रोधासी वश होती । ते निजतपा नागवती । शापदीप्तिअनुवादें ।। ७३ ।। जे अपार सागर तरती । ते गोष्पदोदकीं बुडती । तेवीं मज कामातें जिणोनि जाती । तेही नागविजेती निजक्रोधें ।। ७४ ।। मज कामाची अपूर्ण कामवृत्ती । तेचि क्रोधाची दृढ स्थिती । काम क्रोध अभक्तां बाधिती । हरिभक्तांप्रती तें न चले ।। ७५ ।। तुझ्या भक्तांप्रती जाण । न चले कामक्रोधादिबंधन । तो तूं भक्तपति नारायण । तुज आमुचें कामपण केवीं बाधी ।। ७६ ।। नेणतां तुझा महिमा । आम्ही करूं आलों निजधर्मा । तुजपासीं नित्य निज क्षमा । पुरुषोत्तमा कृपाळुवा ।। ७७ ।।

—केवल तप करणाऱ्या तुझ्या भक्तांची दोन प्रकारची गति आहे. एक ते माझ्या तरी अधीन होतात किंवा क्रोधवश होतात. त्यांतील कामाच्या वश झालेले कामोपभोगाचा तरी अनुभव घेतात, पण जे क्रोधवश होतात ते तर अति मूर्खच होत, असें ते कामादिदेव सांगतात—

केचित्—कित्येक, **क्षुत्तृट्त्रिकालगुणमारुतजैव्ह्यशैश्न्यान् अपारजलधीन् अस्मान्**—क्षुधा, तृषा, वर्षाच्या तीन ऋतूंचे शीत, उष्ण, वृष्टि हे तीन गुण, बाह्य किंवा प्राणाख्य आंतरवायु, जिव्हाभोग, गुह्योपभोग अशा या अपार सागररूप आम्हांला, **अतितीर्य**—उल्लंघून, **विफलस्य क्रोधस्य वशं यान्ति**—निष्फल क्रोधाच्या अधीन होतात. **गोः पदे मज्जंति**—ते गायीच्या पावलांत बुडतात. **च**—आणि, **दुश्चरतपः वृथा उत्सृजन्ति**—मोठ्या कष्टानें संपादन केलेल्या तपाचाहि क्षय करितात. [क्षुधा, तृषा इत्यादि हे आम्ही म्हणजे अपार समुद्रच आहोंत. पण कित्येक मूढ आम्हांला तरून जातात आणि समुद्र तरून गेलेला एखाद्या गायीच्या पावलांत जसा बुडावा त्याप्रमाणें निष्फल क्रोधाच्या अधीन होतात व आपल्या दुश्चर तपाचाहि फुकट नाश करून घेतात.] ११.

प्राणायामानें प्राण व अपान त्यांच्या गतींचा निरोध करून, प्राणाला स्वाधीन करून घेऊन वायु, वृष्टि, शीत, उष्ण, यांस सहन करून जे अनुष्ठानांत गुंततात, ६९ क्षुधा व तृषा यांचें नियमन करून, जिव्हा, उपस्थ यांना स्वाधीन ठेवून, मज कामाला जिंकिलें आहे असें मानून निष्कामत्वाच्या अभिमानानें उन्मत्त होतात, १७० ते अल्प अपमानानेंहि क्रोधवश होतात व शाप देऊन तपःसंपत्ति फुकट गमावितात. ७१ सकाम अनुष्ठानानें ते स्वर्गांतील फुलांच्या माळा, चंदन, अप्सरा व अमृत इत्यादि भोग मज कामाच्या आसक्तीनें भोगितात; ७२ पण जे मज कामाची उपेक्षा करितात, ते क्रोधाला वश होतात व घोर शाप देऊन आपल्या तपाला आंचवतात. ७३ जे अपार सागर तरून जातात तेहि जसे गायीच्या उमटलेल्या पावलांत बुडावें तसे मज कामाला जिंकून जातात व क्रोधाकडून स्वतःला नागवून घेतात. ७४ मज कामाची कामवृत्ति पूर्ण न होणें हीच क्रोधाची दृढस्थिति आहे. पण ते दोघेहि अभक्तांना पीडा देतात. हरिभक्तापुढें त्यांचें कांहीं चालत नाहीं ७५ आणि तुझ्या भक्तांपुढेंहि जर कामक्रोधादिकांचें कांहीं चालत नाहीं, तर भक्तपति जो तूं नारायण त्या तुला आमची पीडा कशी होणार! ७६ तुझा महिमा न जाणतां आम्ही तुझ्यापाशीं आमच्या स्वभावानुरूप वागावयास आलों. पण हे कृपाळु पुरुषोत्तमा, तुझ्यापाशीं नित्य क्षमा आहे. १७७.

इति प्रगृणतां तेषां स्त्रियोऽत्यद्भुतदर्शनाः । दर्शयामास शुश्रूषां स्वर्चिताः कुर्वतीर्विभुः ॥ १२ ॥

अपकाऱ्यां उपकार करिती । या नांव निर्विकार निजशांती । तेचि शांतीची परिपाकस्थिती । विघ्नकर्त्यांप्रती हरि दावी ॥ ७८ ॥ सांगोनियां आपुली स्थिती । कामादिक स्तुति करिती । तंव परमाश्चर्य देखती । स्त्रिया अत्यद्भुती अकस्मात ॥ ७९ ॥ स्वरूपवैभव अळंकार । श्रियेहूनियां सुंदर । सेवेलागीं अतितत्पर । सदा सादर सावधानें ॥ १८० ॥ नवल लाघव नारायणा । कैसें या दाखविलें विंदाना । त्या स्त्रियांखालीं स्वर्गांगना । दिवा खद्योत जाणा तैशा दिसती ॥ ८१ ॥

ते देवानुचरा दृष्ट्वा स्त्रियः श्रीरिव रूपिणी । गन्धेन मुमुहुस्तासां रूपौदार्यहतश्रियः ॥ १३ ॥

या स्त्रिया देखोनि दिठीं । कामु मूर्च्छित पडिला सृष्टीं । वसंत घटघटां लाळ घोंटी । क्रोधाची दृष्टी तटस्थ ठेली ॥ ८२ ॥ भ्रमर विसरले झणत्कार । कोकिळा विसरल्या पंचम स्वर । प्राण विसरला संचार । देवानुचर भुलले ॥ ८३ ॥ देखोनि त्यांचिया स्वरूपासी । अप्सरा दिसती जैशा दासी । अत्यंत लज्जा झाली त्यांसी । काळिमेसी उतरल्या ॥ ८४ ॥ त्यांचे अंगींचा सुगंध वातु । तेणें भुलला वसंतु । मलयानिल झाला भ्रांतु । त्यांचा अंगवातु लागतां ॥ ८५ ॥ नारायणाची विद्या कैसी । जे भुलवूं आले आपणासी । भुली पाडिली तयांसी । योगमायेसी दावूनी ॥ ८६ ॥ सुंदरत्वें रंभा तिलोत्तमा । जिया मंदरमथनीं जिंतिलिया रमा । रमेहूनियां उपमा । उत्तमोत्तमा अतिरूपें ॥ ८७ ॥

इति प्रगृणतां तेषां—ते कामादि असें बोलत असतां, **विभुः**—नारायण, **स्वर्चिताः शुश्रूषां कुर्वतीः**—उत्तमप्रकारें अलंकृत झालेल्या व शुश्रूषा करणाऱ्या, **अत्यद्भुतदर्शनाः स्त्रियः दर्शयामास**—ज्यांचें दर्शन अद्भुत आहे अशा स्त्रिया दाखविता झाला. [नारायणानें कामादिकांचा स्वतःच्या लावण्यादिकांविषयींचा गर्व शांत होण्यासाठीं योगसामर्थ्यानें उत्पन्न केलेल्या व आपली शुश्रूषा करणाऱ्या अति अद्भुत स्त्रिया दाखविल्या.] १२.

अपकार करणारांवर उपकार करणें यासच निर्विकार शांति म्हणतात. त्या शांतीचीच परिपक्व अवस्था कामादि विघ्नकर्त्यांस हरीनें दाखविली. ७८ तेव्हां आपआपली स्थिति सांगून कामादिक जों स्तुति करीत आहेत, तोंच त्यांनीं एक मोठें आश्चर्य पाहिलें. त्यांना तेथें अति अद्भुत स्त्रिया अकस्मात् दिसल्या. ७९ त्यांचें स्वरूप व भूषणें लक्ष्मीपेक्षांहि सरस होतीं. त्या नारायणाच्या सेवेला तत्पर होत्या. १८० नारायणाची लीला अगाध आहे. त्यानें हा चमत्कार कसा दाखविला, पहा. त्या स्त्रियांच्या पुढें देवांगनाहि, दिव्यापुढें जसा काजवा, तशा निस्तेज झाल्या. १८१.

ते देवानुचराः—ते देवांचे अनुचर, **रूपिणी श्रीः इव स्त्रियः दृष्ट्वा**—मूर्तिमान लक्ष्मीप्रमाणेंच असलेल्या त्या स्त्रियांना पाहून, **रूपौदार्यहतश्रियः**—त्यांच्या रूपाच्या उत्कृष्टतेनें ज्यांचें तेज दिपून गेलें आहे असे होत्साते, **तासां गंधेन मुमुहुः**—त्यांच्या सुगंधानें मोहित झाले. [नारायणानें उत्पन्न केलेल्या साक्षात् लक्ष्मीसारख्या त्या स्त्रियांना पाहून कामादि देवानुचर त्यांच्या उत्कृष्ट स्वरूपानें निस्तेज होत्साते त्या स्त्रियांच्या स्वाभाविक सुगंधानें मोहित झाले.] १३.

या स्त्रिया दृष्टीस पडतांच, काम भूमीवर मूर्च्छितच पडला. वसंत घटाघट लाळ घोटूं लागला. क्रोधाचे डोळे ताठले. ८२ भ्रमर गुंजारव विसरले. कोकिळा आपला पंचम स्वर विरसल्या. प्राण संचार विसरला व देवानुचर भुलून गेले. ८३ त्यांच्या स्वरूपापुढें अप्सरा दासी शोभूं लागल्या. त्यांना अत्यंत लाज वाटून त्यांचीं तोंडें काळवंडलीं.८४ त्या स्त्रियांच्या अंगाचा जो परिमल सुटला होता त्यानें वसंत भुलला. त्यांच्या अंगवायूचा सुगंधयुक्त स्पर्श होतांच मलय पर्वतहि भ्रांत झाला. ८५ जे आपल्याला भुलविण्यास आले त्यांसच योगमाया दाखवून ज्यानें भुलविलें, त्या नारायणाची विद्या—योगसामर्थ्य किती अद्भुत असलें पाहिजे ! ८६ रंभा, तिलोत्तमा इत्यादि अप्सरा फार सुंदर म्हणून प्रसिद्ध आहेत; तरी समुद्रमंथनाच्या वेळीं उत्पन्न झालेल्या रमेनें आपल्या सौंदर्यानें त्यांना जिंकिलें. पण नारायणानें उत्पन्न केलेल्या या स्त्रिया त्या रमेहूनहि निरुपम होत्या. १८७.

तानाह देवदेवेशः प्रणतान्प्रहसन्निव । आसामेकतमां वृङ्ग्ध्वं सवर्णां स्वर्गभूषणाम् ॥ १४ ॥

तें अतिआश्चर्य देखोन । झाले कामादि मूर्च्छापन्न । तयांप्रति नारायण । काय हांसोनी बोलिला ॥ ८८ ॥ आम्हीं अवश्य पूजावें तुह्मांसी । कांहीं अर्पावें बलिदानासी । संतोषवाव्या इंद्रासी । यांतील एकादी दासी अंगीकारा तुम्हीं ॥ ८९ ॥ यांचें सौंदर्य अतिथोर । ह्मणाल होईल अपमानकर । तुह्मांसमान जे सुंदर । तिचा अंगीकार करावा तुम्हीं ॥ १९० ॥ ह्मणाल यांत नाहीं हीन । अवघ्या सौंदर्यें संपूर्ण । कोणी न दिसे आह्मांसमान । केवीं आपण अंगीकारावी ॥ ९१ ॥ जरी नाहीं तुह्मांसमान । सकळ सौंदर्यें अतिसंपन्न । तरी एकीचें करावें वरण । होईल भूषण स्वर्गासी ॥ ९२ ॥ ऐसें नारायणाचें वचन । ऐकोनि हरिखलीं संपूर्ण । करूनियां साष्टांग नमन । मस्तकीं वचन वंदिलें ॥ ९३ ॥

ओमित्यादेशमादाय नत्वा तं सुरबन्दिनः । उर्वशीमप्सरःश्रेष्ठां पुरस्कृत्य दिवं ययुः ॥ १५ ॥

इन्द्रायानम्य सदसि शृण्वतां त्रिदिवौकसाम् । ऊचुर्नारायणबलं शक्रस्तत्रास विस्मितः ॥ १६ ॥

ऐकोनि नारायणवचन । मस्तकांबुजीं करूनियां नमन । उर्वशी पुढापासून । कामादि गण निघाले वेगीं ॥ ९४ ॥ नारायणाचे ऊरुस्पर्शीं । उभी होती नारायणापाशीं । तेंचि नांव झालें तिसी । म्हणती उर्वशी स्वर्गांगना ॥ ९५ ॥ ते देवांचे देवदूत । सर्गा पावले समस्त । मग शक्राचे सभेआंत ।

देवदेवेशः—तेव्हां देवाधिदेव, प्रणतान् तान्—आपल्यापुढें अत्यंत नम्र झालेल्या त्यांना, प्रहसन् इव आह—जणुंकाय हंसतच म्हणाला, आसां सवर्णां स्वर्गभूषणां एकतमां वृङ्ग्ध्वम्—यांतील समानरूप व स्वर्गाला भूषणभूत अशी एक स्त्री मागून घ्या. [नंतर नम्र झालेल्या त्या कामादिकांना नारायण हंसत म्हणाला कीं, तुम्ही यांतील एखादी स्त्री मागून घ्या. या कोठें व आम्ही कोठें असें म्हणाल तर 'तुमच्यासारख्याच स्वरूपाची जी असेल ती मागून घ्या.' पण आम्हांला अनुरूप अशी त्यांत एकहि नाहीं, असें जर म्हणाल तर निदान स्वर्गाला भूषणरूप अशी एखादी घ्या.] १४.

तें अत्यंत आश्चर्य पाहून कामादिकांस मूर्च्छेनें घेरिलें. तेव्हां त्यांना नारायण हंसून बोलला. ८८ आम्हीं तुमचें पूजन अवश्य करावें. तुम्हांला कांहीं अहेर द्यावा. इंद्राला संतोषविण्यासाठीं यांतील एखाद्या दासीचा तुम्ही स्वीकार करा. ८९ पण 'यांचें सौंदर्य अनुपम आहे. त आमच्या अपमानाला कारण होईल,' असें जर तुम्हांला वाटत असेल, तर तुमच्यासारखीच जी सुंदर असेल तिलाच स्वीकारा. १९० किंवा 'यांत रूपानें हीन कोणीच नाहीं. सगळ्याच सौंदर्यपूर्ण आहेत. आमच्या योग्य कोणीच दिसत नाहीं. मग कसा अंगीकार करावा !' ९१ असें जर म्हणाल, तर 'तुमच्या अनुरूप नसली तर नसली; सगळ्याच जर लावण्यसंपन्न असल्या, तर त्यांपैकीं एकीची तरी निवड करा, म्हणजे ती स्वर्गलोकाला भूषण होईल,' ९२ असें नारायणाचें वचन ऐकून त्या सर्वांना फार हर्ष वाटला आणि त्यांनीं साष्टांग नमस्कार करून त्याचे शब्द शिरसा वंद्य केले. १९३.

सुरबन्दिनः—कामादि देवदूत, ओं इति आदेशं आदाय—ओं अशी आज्ञा स्वीकारून, तं नत्वा—त्या नारायणाला नमस्कार करून, अप्सरःश्रेष्ठां उर्वशीं पुरस्कृत्य—अप्सरांतील श्रेष्ठ अशा उर्वशीला पुढें करून, दिवं ययुः—स्वर्गाला गेले. इन्द्राय आनम्य—इंद्राला प्रणाम करून, सदसि—देवसभेंत, त्रिदिवौकसां शृण्वतां—सर्व देव ऐकत असतांना, नारायण-बलं ऊचुः—नारायणाचें सामर्थ्य इंद्राला सांगते झाले. शक्रः विस्मितः तत्रास—तेव्हां इंद्र विस्मित होऊन भ्याला. [तेव्हां ते देवभृत्य कामादिक 'ठीक आहे' असें बोलून, नमस्कार करून, उर्वशीला बरोबर घेऊन स्वर्गलोकीं गेले. तेथें इंद्राला प्रणाम करून देवसभेंत सर्व देवांच्या समक्ष नारायणाचें सामर्थ्य सांगते झाले. तें ऐकून इंद्राला भय वाटलें व तो विस्मित झाला. किंवा 'तत्रास विस्मितः'—असा पदच्छेद न करितां 'तत्र आस विस्मितः' असा पदच्छेद करावा. म्हणजे त्यावेळीं विस्मित होऊन राहिला.] १५-१६.

याप्रमाणें नारायणाचें वचन ऐकून त्याच्या चरणांवर मस्तक ठेवून कामादिगण उर्वशीला पुढें घालून परत जाण्यास त्वरेनें निघाले. ९४ नारायणापाशीं त्यांच्या मांडीला स्पर्श करून उभी होती, म्हणून तिला उर्वशी हें नांव पडलें व उर्वशीला स्वर्गांगना म्हणूं लागले. ९५ ते सर्व देवदूत स्वर्गाला जाऊन पोंचले आणि इंद्राच्या सभेंत

सांगती अद्‌भुत नारायणशक्ती ॥ ९६ ॥ तिहीं नारायणाचें चरित्र । सांगीतलें अतिपवित्र । तेणें अवघेचि सुरवर । झाले थोर विस्मित पैं ॥ ९७ ॥ इंद्रें देखोनि उर्वशी । तिसी भुलला अहर्निशीं । बाहेर यावें सभेसी । हें वर्षानुवर्षीं नाठवे ॥ ९८ ॥ हे प्रथमावतार वार्ता । जे कां नारायणाची कथा । पुढील अवतार आतां । नृपनाथा अवधारीं ॥ ९९ ॥ ऐक राया अतिअपूर्व । छळवादियां पूजा सर्व । करून दाखवी स्वयमेव । पूर्णानुभव या नांव ॥ २०० ॥ ॥ आशंका ॥ भावें करितां भगवद्भजन । यापरी इंद्र करी विघ्न । नारायण चैतन्यघन । तेणें विघ्नें संपूर्ण पराभविलीं ॥ १ ॥ मा भाळ्याभोळ्यांकरितां भक्ती । ऐशीं विघ्नें जैं छळूं येती । तैं कदा नव्हे भगवत्प्राप्ती । ऐसा विकल्प चित्तीं झणीं धरिशी ॥ २ ॥ ब्रह्मादिकां सर्व भूतां । भ्रुकुटिमात्रें जो नियंता । त्या भगवंतातें भजतां । विघ्नें सर्वथा बाधूं न शकती ॥ ३ ॥ ज्याचेनि इंद्रा इंद्रपण । तो भावें भजतां श्रीनारायण । भक्तांसी विघ्न करी कोण । हरि रक्षण निजभक्तां ॥ ४ ॥ इंद्रमुख कामादिक । विघ्नें छळती सकळ लोक । त्यांचाही नारायण चाळक । तो भक्तांसी देख स्पर्शों नेदी ॥ ५ ॥ विघ्नांसी भुलविलें जेणें संपूर्ण । तो नित्य स्मरतां नारायण । अपधाकें विघ्नें पळती जाण । भक्तसंरक्षण हरिनामें ॥ ६ ॥ करावया निजभक्तकैवार । देवो धरी नानावतार । त्याच्या अवतारांचें चरित्र । अतिविचित्र अवधारीं ॥ ७ ॥

हंसस्वरूप्यवदद्च्युत आत्मयोगं दत्तः कुमार ऋषभो भगवान् पिता नः ।
विष्णुः शिवाय जगतां कलयाऽवतीर्णस्तेनाहृता मधुभिदा श्रुतयो हयास्ये ॥ १७ ॥

नारायणाच्या अद्‌भुतशक्तीचें वर्णन करूं लागले. ९६ त्यांनीं नारायणाचें अत्यंत शुद्ध चरित्र सांगितलें, तें ऐकून सर्व देव अत्यंत विस्मित झाले. ९७ उर्वशीला पाहून तर इंद्र इतका मोहित झाला कीं, वर्षानुवर्षे तो सभेंत जाण्याचेंहि विसरला. ९८ ही नारायणाच्या पहिल्या अवताराची कथा आहे. हे राजा, आतां या पुढील अवतारांचा अपूर्व वृत्तांत ऐक. ९९ आपल्याला छळणारांचाहि सत्कार करणें, हें पूर्णावस्थेचें मुख्य लक्षण आहे. तूं कदाचित् यावर म्हणशील कीं, २०० प्रेमानें भगवद्भजन करूं लागलें असतां इंद्र पूर्वोक्त प्रकारें विघ्न करितो. नारायण चैतन्यघन असल्यामुळें त्यानें त्या सर्व विघ्नांचा पराभव केला, १ पण इतर सामान्य भाळेभोळे लोक भक्ति करूं लागले असतां जेव्हां त्यांना अशीं विघ्नें छळूं लागतात, तेव्हां भगवत्प्राप्ति होणें केव्हांहि शक्य नाहीं ! पण असा विकल्प तूं मनांत धरूं नकोस. २ ब्रह्मदेवापासून तृणापर्यंत सर्व भूतांचें नुसत्या नेत्रकटाक्षानें नियमन करणारा जो भगवान् त्याचें भजन करूं लागलें असतां विघ्नें कांहीं करूं शकत नाहींत. ३ ज्याच्यामुळें इंद्राला इंद्रत्व प्राप्त होतें त्या नारायणाचीच प्रेमानें भक्ति करणारांस विघ्नें कोण करणार ! हरि स्वभक्तांचा रक्षक आहे. ४ इंद्रादिक व कामादिक सर्व लोकांना विघ्नांच्या द्वारां छळितात. पण नारायण त्यांचाहि चालक आहे. तो भक्तांना विघ्नांचा स्पर्श होऊं देत नाहीं. ५ त्यानें विघ्नांसहि पूर्णपणें भुलविलें. त्या नारायणाचें नित्य स्मरण करीत असतां विघ्नें धाकानें पळून जातात. हरिनामानेंच भक्तांचें संरक्षण होतें. ६ भक्तांचा कैवार घेऊन देव अनेक अवतार घेतो. त्याच्या अवताराचें अति विचित्र चरित्र तूं ऐक. २०७.

—आतां द्रुमिल नारायणाचे इतर अवतार व त्यांचें चरित्र सांगतो—

हंसस्वरूपी अच्युतः विष्णुः—हंसस्वरूपी अच्युत विष्णु, **जगतां शिवाय दत्तः कुमारः नः पिता भगवान् ऋषभः इति कलया अवतीर्णः सन्**—जगाच्या कल्याणासाठीं दत्तात्रय, सनकादि कुमार, आमचा पिता भगवान् ऋषभ इत्यादि रूपानें अंशानें अवतीर्ण होऊन, **आत्मयोगं अवदत्**—आत्मयोग सांगता झाला. **तेन हयास्ये मधुभिदा श्रुतयः आहृता**—त्यानें हयग्रीव अवतारामध्यें मधुराक्षसाचा नाश करून श्रुतींना परत आणिलें. [हंसरूपी अच्युत विष्णूनें जगाच्या कल्याणासाठीं दत्तात्रयादिरूपअंशानें अवतार घेऊन आत्मयोग सांगितला. त्याच हयग्रीवअवतारांत मधुराक्षसाचें निर्दालन करून श्रुतींना परत आणिलें.] १७.

सनकादिक ब्रह्मनंदन । तिंहीं पित्यासी केला प्रश्न । प्रश्नखंडणमिसें जाण । केलें ब्रह्मज्ञान हंसावतारें ।। ८ ।। नित्य स्मरतां हरीचें नाम । महाविघ्नें होती भस्म । त्याचे अवतारसंभ्रम । उत्तमोत्तम अवधारीं ।। ९ ।। ज्याचेनि नामें पळे कृतांतु । ज्याचेनि नामें जन्ममरणां घातु । तो अवतारु श्रीदत्तु । मूर्तिमंतू परब्रह्म ।। २१० ।। नैष्ठिक ब्रह्मचारी निश्चितीं । ज्यासी स्वप्नीं नाहीं वीर्यच्युती । यालागीं कुमार म्हणती । अवतारमूर्ति सनकादिक ।। ११ ।। आणि आमुचा जो कां पिता । ऋषभ नारायण ज्ञाता । तोही अवतार नृपनाथा । जाण तत्त्वतां भगवन्मूर्ती ।। १२ ।। येहीं नामीं ऋषि संपूर्ण । अवतारीं अवतरे नारायण । जो जगाचा प्रतिपाळण । स्वांशें श्रीकृष्ण अवतरे ।। १३ ।। तोचि स्वयें गा श्रीकृष्ण । मधुकैटभ निर्दळून । नामें जो कां मधुसूदन । तोचि अवतरून हयग्रीव झाला ।। १४ ।। तेणें शंख मर्दून पुढती । उद्धरिल्या बुडाल्या श्रुती । आणोनि दिधल्या ब्रह्मयाहातीं । जाण निश्चितीं वेदरक्षणा ।। १५ ।।

गुप्तोऽप्यये मनुरिलौषधयश्च मात्स्ये क्रोडे हतो दितिज उद्धरताऽम्भसः क्ष्माम् ।
कौर्मे धृतोऽद्रिरमृतोन्मथने स्वपृष्ठे ग्राहात्प्रपन्नमिभराजममुञ्चदार्तम् ।। १८ ।।

तेणेंचि मत्स्यावतारें । प्रलयकालांबुमहाभारें । मनुसगट रक्षिलें धरे । निजनिर्धारें औषधींसीं ।। १६ ।। तेणेंचि कमठावतारा । स्वपृष्ठीं धरूनि गिरिवरा । मंथोनियां क्षीरसागरा । अमृत सुरवरां अर्पिलें ।। १७ ।। तेणें आर्तत्राणा तांतडी । वैकुंठींहून घालोनि उडी । गजाचें ग्राहबंधन तोडी । उद्धरिलें आवडीं गजेंद्रातें ।। १८ ।।

सनकादिक ब्रह्मकुमारांनीं पित्याला प्रश्न केला व त्यांच्या त्या प्रश्नाचें उत्तर देण्याच्या निमित्तानें हरीनें हंसावतार घेऊन आत्मयोग सांगितला. ८ ज्या हरीचें नित्य नामस्मरण केलें असतां महाविघ्नेंहि जळून भस्म होतात, त्याचें उत्तमोत्तम अवतारकृत्य ऐक. ९ ज्याचें नांव ऐकतांच कृतांत काळहि पळूं लागतो, ज्याच्या नामस्मरणानें जन्म-मरण नाहींसें होतें, तो श्रीदत्त अवतार साक्षात् परब्रह्मच आहे. २१० जे नैष्ठिक ब्रह्मचारी, ज्यांच्या ब्रह्मचर्याचा भंग स्वप्नांतहि होत नाहीं, म्हणून ज्यांना कुमार म्हणतात, ते सनकादिकहि भगवदवताररूपच आहेत. ११ आणि नारायणाला जाणणारा आमचा पिता जो ऋषभ, तोहि भगवानाचाच अवतार जाणावा. १२ हे राजा, ऋषींच्या रूपानें तो नारायणच अवतीर्ण होतो. जो जगाचा प्रतिपालन करणारा श्रीकृष्ण तोच नेहमीं स्वांशानें अवतार घेतो. १३ तोच स्वतः श्रीकृष्ण हयग्रीव अवतार घेऊन मधुकैटभ राक्षसांचा नाश करून मधुसूदन नांवानें प्रसिद्ध झाला. १४ त्यानेंच पुढें शंखासुरादि राक्षसांना मारून व बुडालेल्या श्रुतींचा वेदरक्षणासाठीं उद्धार करून त्या ब्रह्मदेवाच्या स्वाधीन केल्या. २१५.

मात्स्ये–मत्स्यावतारांत, अप्यये–प्रलयसमयीं, मनुः गुप्तः–मनूचें रक्षण केलें. इला औषधयः च गुप्ताः–पृथ्वी व औषधि यांचें रक्षण केलें. क्रोडे अंभसः क्ष्मां उद्धरता दितिजः हतः-वराहावतारांत जलांतून पृथ्वीचा उद्धार करणाऱ्या त्यानें हिरण्याक्षदैत्याला मारिलें. कौर्मे–कूर्मावतारांत, अमृतोन्मथने–अमृतासाठीं क्षीरसागराचें मंथन चाललें असतां, अद्रिः स्वपृष्ठे धृतः–मंदारपर्वत आपल्या पाठीवर धारण केला. आर्तं प्रपन्नं इभराजं–अतिशय पीडित होऊन शरण आलेल्या गजराजाला, ग्राहात् अमुंचत्–नक्रापासून सोडविलें. १८.

त्यानेंच मत्स्यावतारामध्यें प्रलयकाळच्या जलाच्या महाभारानें भ्यालेल्या पृथ्वीचें मनु व वनस्पती यांसह रक्षण केलें. १६ कूर्मावतारांत त्यानेंच आपल्या पाठीवर मंदरपर्वताला धारण करून क्षीरसागराचें मंथन करून, देवांना अमृत अर्पण केलें. १७ दीनांच्या रक्षणासाठीं गडबडीनें वैकुंठांतून उडी टाकूनहि गजेंद्राला नक्राच्या मिठींतून सोडविलें व त्यानेंच आवडीनें त्याचा उद्धार केला. २१८.

संस्तुन्वतोऽब्धिपतितान् श्रमणानृषींश्च शक्रं च वृत्रवधतस्तमसि प्रविष्टम् ।
देवस्त्रियोऽसुरगृहे पिहिता अनाथा जघ्नेऽसुरेन्द्रमभयाय सतां नृसिंहे ॥ १९ ॥

मार्कंडेयो एके वेळीं । बुडतां अकाळप्रळयजळीं । तेणें स्मरतां वनमाळी । तारी तत्काळीं वटपत्रशायी ॥ १९ ॥ शाळिग्राम पूजितां ऋषीश्वरीं । नळ वानरू ते अवसरीं । देवपूजा टाकी सागरीं । चेष्टा वानरीं स्वभावें ॥ २२० ॥ तें देखोनि ऋषीश्वरीं । शिळा न बुडोत तुझ्या करीं । ऐसा शाप ते अवसरीं । क्षोभेंकरीं दिधला ॥ २१ ॥ तैं शाळिग्राम सागरोदरीं । तरतां देखिले ऋषीश्वरीं । काढावया रिघतां भीतरीं । लहरीकरीं निर्बुजले ॥ २२ ॥ ते काळीं ऋषीश्वरीं । आर्तिहरण स्तविला हरी । तेथ अवतरोनि श्रीहरी । ऋषींतें तारी पूजेसहित ॥ २३ ॥ वृत्र वधिला वज्रघातें । ते ब्रह्महत्या इंद्रातें । तेणें दोषें तो अंधतमातें । जाण पां निश्चितें बुडत होता ॥ २४ ॥ तेथ अवतरोनि श्रीअनंतें । चतुर्धा वांटूनि ते हत्येतें । शुद्ध केलें इंद्रातें । कृपावंतें कृपाळुवें ॥ २५ ॥ जिणोनियां अमरपुरें । हिरोनि देवांचीं अंतौरें । तीं कोंडोनियां समग्रें । मुरें सहा असुरें एकंदर केलें ॥ २६ ॥ तो मुरमर्दन श्रीहरी । यालागीं नांवें मुरारी । देवस्त्रिया काढोनि बाहेरी । देवांच्या करीं अर्पिता झाला ॥ २७ ॥ जो असुरांमाजी चूडामणी । जो द्वेषियांमाजीं अग्रगणी । तो हरिनाम ऐकतां कानीं । अतिक्षोभें मनीं प्रज्वळों लागे ॥ २८ ॥ जो पूर्ण क्रोधाचा उदधी । जो अविवेकाचा महानिधी । जो हरि स्मरे त्या पुत्रातें बाधी । गर्वमदीं उन्मत्त ॥ २९ ॥ तो हिरण्यकशिपू नखधारीं । स्वयें निवटी नरकेसरी । जो निजभक्तांचा कैवारी । अभयकारी साधूंचा ॥ २३० ॥

संस्तुन्वतः अब्धिपतितान् श्रमणान् ऋषीन् (अमोचयत्)—स्तुति करणाऱ्या व कश्यपासाठीं समिधा आणीत असतां गोष्पदांत बुडालेल्या आणि तें पाहून इंद्रानें उपहास केलेल्या वालखिल्य ऋषींचा त्यांतून उद्धार करून त्यांस आपत्तींतून सोडविलें. **वृत्रवधतः तमसि प्रविष्टं शक्रं (मोचयामास)**—वृत्राच्या वधामुळें ब्रह्महत्यारूप तमांत प्रविष्ट झालेल्या इंद्राला सोडविलें. **असुरगृहे पिहिताः अनाथाः देवस्त्रियः**—असुरांच्या गृहांत अडकवून ठेवलेल्या अनाथ देवस्त्रियांना अनेक अवतार घेऊन सोडविलें. **नृसिंहे सतां अभयाय असुरेंद्रं जघ्ने**—नृसिंह अवतारांत साधूंना अभय देण्यासाठीं हिरण्यकशिपूला मारिलें. १९.

एकदां मार्कंडेय ऋषि प्रलयकाळच्या महापुरांत बुडत असतां त्यानें भगवान् वनमाळीचें स्मरण केलें. त्याबरोबर वटपत्रावर शयन करणाऱ्या भगवानानें तत्काळ त्याला तारिलें. १९ ऋषीश्वरानें शालिग्रामाची पूजा केली असतां नळ नांवाच्या वानरानें आपल्या स्वभावानुरूप ती पूजा समुद्रांत फेंकून दिली. २२० तें पाहून ऋषीश्वरानें 'तुझ्या हातून शिळा बुडणार नाहीं' असा रागानें शाप दिला. २१ तेव्हां शालिग्राम सागरावर तरंगतांना दिसले आणि ऋषीश्वर ते काढावयास समुद्रांत शिरले. पण समुद्राच्या लाटांत सांपडून घाबरले. २२ तेव्हां सर्वांच्या दुःखाचें निवारण करणाऱ्या हरीची त्यांनीं स्तुति केली. त्याबरोबर श्रीहरि तेथें अवतरला व त्यानें त्या पूजेसह ऋषींना तारिलें. २३ इंद्रानें वृत्रासुराला वज्राघातानें मारिलें, त्यामुळें त्याला ब्रह्महत्या लागली. त्या दोषानें तो अंधतमनामक नरकांत निश्चयानें बुडत होता. २४ इतक्यांत श्रीअनंत तेथें अवतरला आणि त्याची ब्रह्महत्या स्त्रिया, नद्यांचें नूतन जल, अग्नि व गोमुख अशा चार ठिकाणीं वांटून देऊन कृपाळु देवानें इंद्राला शुद्ध केलें. २५ देवांचीं नगरें जिंकून त्यांचीं अंतःपुरें हिरावून घेऊन त्यांतील सर्व स्त्रियांना मुर दैत्यानें कोंडून, आपल्या स्वाधीन ठेविलें. २६ पण श्रीहरीनें त्याला मारिलें. म्हणूनच त्याला 'मुरारि' हें नांव प्राप्त झालें. त्या मुरारीनें मुर दैत्याला मारून देवस्त्रियांना त्याच्या बंदींतून सोडवून देवांच्या स्वाधीन केलें. २७ जो असुरांचा शिरोमणि, द्वेष्ट्यांचा अग्रणी, कानानें हरीचें नांव ऐकतांच मनांत अति क्षुब्ध होऊन ज्याच्या अंगाचा भडका उडत असे, २८ जो क्रोधाचा पूर्णसागर, अविवेकाचा महानिधि, हरीचें स्मरण करणाऱ्या आपल्या पुत्रालाहि ज्यानें अतिशय छळिलें, जो अभिमानमदानें उन्मत्त झालेला हिरण्यकशिपु, २९ त्याला स्वतः नृसिंहरूप धरून आपल्या नखाच्या धारांनीं मारिलें. साधूंना अभय देणाऱ्या व आपल्या भक्तांचा कैवार घेणाऱ्या हरीनें हीं व अशींच आणखींहि अनेक अवतारकार्यें केलीं. २३०.

देवासुरे युधि च दैत्यपतीन् सुरार्थे हत्वाऽन्तरेषु भुवनान्यदधात्कलाभिः ।
भूत्वाऽथ वामन इमामहरद्बलेः क्ष्मां याञ्चाछलेन समदाददितेः सुतेभ्यः ॥ २० ॥

समुद्रमंथनाच्या शेवटीं । क्षीरसागराचे तटीं । सुरां असुरां कळी मोटी । अमृतासाठीं मांडली ॥ ३१ ॥ तेव्हां अमृत विटे जें देखोनी । तो अवतारु घेतला मोहिनी । तेणें असुरां सुरापानी । अमृत-दानी देवांसी ॥ ३२ ॥ तेथ चोरूनि घेतां अमृतग्रासा । निवटिला राहूचा घसा । त्याच्या कबंधावरी म्हाळसा । वास निवासा स्वयें केला ॥ ३३ ॥ सुरसाह्य नारायणु । द्वारके कुश निर्दाळिनु । कां लवणासुर मर्दूनु । अवतरे आपणु कुमाररूपें ॥ ३४ ॥ ऐसा मन्वंतरामन्वंतरीं । निजभक्तकाजकैवारी । सुरकार्यार्थ श्रीहरी । नाना अवतारीं अवतरे स्वयें ॥ ३५ ॥ तो सुरसाह्य जगज्जीवन । स्वयें कुब्ज झाला वामन । अंगें याचक होऊन । देवांचा अपमान उतरला जेणें ॥ ३६ ॥ दानें दाटुगा बळी । त्यासी देवांचेनि नव्हे कळी । मग त्रिविक्रमरूपें आकळी । यांच्याछळें बळी छळिला जेणें ॥ ३७ ॥ तरी भावबळें बळी प्रबळु । तेणें देवो केला द्वारपाळु । विष्णु सत्व पाहे छळछळुं । शेखीं दासांचा दयाळु दास्य करी स्वयें ॥ ३८ ॥ यापरी बळीचा छळ । करूनि घेतलें दिङ्मंडळ । तेणें अमरगण सकळ । अर्पूनि तत्काळ सुखी केले ॥ ३९ ॥

निःक्षत्रियामकृत गां च त्रिःसप्तकृत्वो रामस्तु हैहयकुलाप्ययभार्गवाग्निः ।
सोऽब्धिं बबन्ध दशवक्त्रमहन्सलङ्कं सीतापतिर्जयति लोकमलघ्नकीर्तिः ॥ २१ ॥

देवासुरे युधि च—देव आणि असुर यांच्या युद्धामध्यें, सुरार्थे दैत्यपतीन् हत्वा—देवांसाठीं दैत्यांच्या अधिपतींना मारून, अंतरेषु कलाभिः भुवनानि अदधात्—सर्व मन्वन्तरांत आपल्या मूर्तींनीं भुवनांचें रक्षण केलें. अथ वामनः भूत्वा—त्यानंतर वामन होऊन, याञ्चाछलेन बलेः क्ष्मां अहरत्—याचनेच्या मिषानें बलीपासून पृथ्वीचें हरण केलें. इमां अदितेः सुतेभ्यः समदात्—व तिचें अदितीच्या पुत्रांना समर्पण केलें. २०.

समुद्रमंथनाच्या शेवटीं क्षीरसागराच्या तीरावर देव व असुर यांमध्यें अमृतासाठीं मोठा कलह माजला. ३१ तेव्हां ज्या रूपाला पाहून अमृतहि फिकें पडतें, तें मोहिनीचें रूप भगवानानें घेतलें व त्या मोहिनीच्या अवतारानें असुरांना सुरापान व देवांना अमृत दिलें. ३२ त्यावेळीं राहु चोरून अमृताचा घोट घेत असतांना त्याचा शिरच्छेद केला व त्याच्या धडावर स्वतः म्हाळसेच्या रूपानें निवास केला. ३३ देवांचा साह्यकर्ता नारायण द्वारकेमध्यें कुशाचें निर्दालन करून, लवणासुराला मारून आपण स्वतः कुमाररूपानें अवतीर्ण झाला. ३४ याप्रमाणें प्रत्येक मन्वंतरांत आपल्या भक्तांचा कैवारी श्रीहरि देवांच्या कार्यासाठीं स्वतः नानाप्रकारचे अवतार घेतो. ३५ तो देवांचा साह्यकर्ता जगज्जीवन स्वतः वामनबटूचें रूप घेऊन याचक झाला आणि त्यानें देवांचा अपमान भरून काढला. ३६ बळि दानाच्या योगानें समर्थ होता, त्याच्याबरोबर देवांना युद्ध करवेना, तेव्हां त्रिविक्रमरूपानें त्यानें त्रिभुवन व्यापिलें व याचनेच्या निमित्तानें बळीला ठकविलें, ३७ पण बळीची भावना प्रबल होती. त्या सामर्थ्यानें त्यानें श्रीहरीला द्वारपाळ केलें. याप्रमाणें विष्णु आपल्या भक्तांना छळून छळून त्यांचें सत्त्व पहातो व शेवटीं त्या भक्तांचाच दास होऊन स्वतः त्यांचें दास्य करूं लागतो. ३८ याप्रकारें बळीचा छळ करून नारायणानें त्याच्यापासून सर्व त्रैलोक्य हिरावून घेतलें व तें देवांना अर्पण करून त्यांना सुखी केलें. २३९.

तु हैहयकुलाप्ययभार्गवाग्निः रामः—त्यानंतर तो भगवान् हैहयाच्या कुलाचा नाश करणारा भार्गवरूप अग्निच असा राम होऊन, त्रिःसप्तकृत्वः गां च निःक्षत्रियां अकृत—एकवीस वेळां पृथ्वी निःक्षत्रिय करिता झाला. सः लोकमलघ्नकीर्तिः सीतापतिः—पुढें वर्तमानसमयीं तोच भगवान् ज्याची कीर्ति लोकांच्या पापाचा नाश करणारी आहे असा दाशरथि सीतापति राम होऊन, अब्धिं बबन्ध—समुद्रावर सेतु बांधिता झाला व, सलङ्कं दशवक्त्रं अहन्—लंकेमध्यें स्थिति असलेल्या दशमुख रावणाला मारिता झाला. स च जयति—तो सर्वांहून उत्कर्ष पावतो. [हा वर्तमानकालीन अवतार आहे.] २१.

तो देवाधिदेवोत्तमु । स्वयें झाला परशुरामु । तेणें क्षत्रियांचा पराक्रमु । केला निर्धमु निजप्रतापें ॥ २४० ॥ तो गोब्राह्मणकैवारी । सहस्रार्जुनातें संहारी । सहस्र भुजांचीं कांडोरीं करी । केली बोहरी दानवकुळा ॥ ४१ ॥ जमदग्नीचा कोपाग्नी । परशुरामतेजें प्रज्वळूनी । हैहयकुळ जाळूनी । आहाळिली अवनी क्षत्रियांची ॥ ४२ ॥ तेणें तीन सप्तकें वीररसु । देऊनि क्षत्रियमद बहुवसु । त्या रोगाचा केला नाशु । धरेचे ईश धरामर केले ॥ ४३ ॥ जो अवतारांचें मूळपीठ । जो वीरवृत्ती अतिउद्भट । तो अवतारांमाजीं श्रेष्ठ । अतिवरिष्ठ श्रीराम ॥ ४४ ॥ पापें पळती रामनामें । नामांकित वंदिजे यमें । गणिकेचीं कर्माकर्में । श्रीरामनामें निर्दळिलीं ॥ ४५ ॥ नामें कळिकाळासी धाक । यमदूतां न मिळे भीक । रामनामगजरें देख । पळे निःशेख जन्ममरण ॥ ४६ ॥ जो देवांचे बंद सोडी । नवग्रहांची बेडी तोडी । जेणें रामराज्याची रोकडी । उभविली गुढी तिहीं लोकीं ॥ ४७ ॥ ज्याचेनि शिळा तरती सागरीं । असुर मारिले वानरीं । जेणें सुवर्णाची नगरी । वोपिली पुरी शरणागतासी ॥ ४८ ॥ जो प्रतापाचा मरगळा । जेणें सेतु बांधिला अवलीला । चरणीं उद्धरिली शिळा । जो निजजिव्हाळा निजभक्तां ॥ ४९ ॥ तो अवतार मूर्तिमंत । राया अद्यापि असे वर्तत । हा संवाद त्रेतायुगांत । द्रुमिल सांगत विदेहासी ॥ २५० ॥ यालागीं श्रीराम श्रीजयराम । नित्य जपे जो हें नाम । तो पुरुषांमाजीं पुरुषोत्तम । कर्माकर्मअतीत तो ॥ ५१ ॥ तें रामनाम अवचटें । भीतरीं रिघे कर्णपुटें । तैं कळिमळांचीं मळकटें । नामोद्धाटें नासती ॥ ५२ ॥ ऐसी रामनामाची ख्याती । जगदुद्धारें केली कीर्ती । धन्य धन्य जे परिसती । धन्य जे गाती रामचरित ॥ ५३ ॥

तो पुरुषोत्तम देवाधिदेव स्वतः परशुराम झाला आणि त्यानें आपल्या प्रतापानें सर्व क्षत्रियांचा पराक्रम फुकट घालविला. २४० त्या गोब्राह्मणांच्या कैवारी नारायणानें सहस्रार्जुनाच्या हजारों भुजांचे तुकडेतुकडे करून त्याचा संहार केला. दानवकुळाचा नाश केला. ४१ जमदग्नीचा कोपाग्नि परशुरामाच्या तेजानें प्रज्वलित झाला व त्या अग्नीनें हैहयकुळाला जाळून पृथ्वीवरील क्षत्रियकुलें ४२ एकवीस वेळां पोळून टाकिलीं. आपल्या वीररसानें क्षत्रियांच्या फार दिवसांच्या मदरूपी रोगाचा नाश केला आणि ब्राह्मणांना पृथ्वीचें स्वामित्व दिलें. ४३ श्रीराम सर्व अवतारांचा आदिपुरुष, पराक्रमी, वीर व सर्व अवतारांमध्यें श्रेष्ठ आहे. ४४ रामनामानें पापें पळून जातात. रामनाम घेणारांस यमहि वंदन करितो. श्रीरामनामानें गणिकेच्याहि पापाचा नाश केला. ४५ रामनामाचा कळिकाळाला धाक वाटतो. यमदूतांना कोणी भीक घालीत नाहीं. रामनामाचा गजर जन्म-मरणालाहि निःशेष नाहींसें करितो. ४६ तो देवांचा बंदिवास सोडवितो, नवग्रहांची बेडी तोडीतो, त्यानें रामराज्याची कीर्ति तिन्ही लोकीं पसरली आहे. ४७ ज्या रामनामाच्या सामर्थ्यानेंच समुद्रांत शिळा तरतात व वानर असुरांना मारूं शकतात, ज्यानें सोन्याची लंकानगरी शरणागत बिभीषणाला नजर केली, ४८ जो प्रतापाची जणुंकाय मूर्तीच, ज्यानें लीलेनें सेतु बांधविला, शिला होऊन पडलेल्या अहल्येचा नुसत्या चरणस्पर्शानें उद्धार केला, जो आपल्या भक्तांना जीव कीं प्राण वाटतो ४९ तो साक्षात् अवतारी राम, हे राजा, अद्यापि या पृथ्वीवर वसत आहे. त्रेतायुगांत ही कथा द्रुमिलानें विदेहराजाला सांगितली. २५० यासाठीं जो कोणी 'श्रीराम श्री जयराम' हें नाम नित्य जपतो, तो मनुष्यांतील श्रेष्ठ पुरुष कर्म व अकर्म यांना उल्लंघून जातो. ५१ असें हें रामनाम, कोणत्याहि निमित्तानें जरी कानांवर पडलें तरी कळिमळाचे दोष नामोच्चाराच्या सामर्थ्यानेंच नाश पावतात. ५२ अशी रामनामाची ख्याति आहे, त्यानें जगदुद्धारानें आपली कीर्ति पसरली. जे रामचरित्र ऐकतात व गातात ते धन्य होत. २५३.

भूमेर्भरावतरणाय यदुष्वजन्मा जातः करिष्यति सुरैरपि दुष्कराणि ।
वादैर्विमोहयति यज्ञकृतेऽतदर्हान् शूद्रान् कलौ क्षितिभुजो न्यहनिष्यदन्ते ॥ २२ ॥

आतां भावी अवतारवार्ता । तुज मी सांगेन नृपनाथा । श्रीकृष्णावतारकथा । परमाद्भुता विचित्र ॥ ५४ ॥ जो परेहून परात्परु । जो कां अजन्मा अक्षरु । जो श्रुतिशास्त्रां अगोचरु । तो पूर्णावतारु श्रीकृष्ण ॥ ५५ ॥ जेथें नाममात्र रिघों न लाहे । जेथें रूपाची न लभे सोये । ज्या ब्रह्मत्व अंगीं न साहे । तो अवतार पाहें श्रीकृष्ण ॥ ५६ ॥ जो वर्णाश्रमांसी नातळे । ज्यासी ईश्वरत्वही वोंविळें । जो अज अव्यय स्वानंदमेळें । तो अवतारु स्वलीलें श्रीकृष्णनाथु ॥ ५७ ॥ ऐसा गुणधर्मकर्मातीतु । तो अवतारु श्रीकृष्णनाथु । प्रगटला यदुवंशाआंतु । स्वयें जगन्नाथु स्वइच्छें ॥ ५८ ॥ जैसें खळाळकल्लोळ चंचळ । भासे परी तें केवळ जळ । काळी भरडी पांढरी चोळ । परी ते केवळ वसुधाचि ॥ ५९ ॥ जे गोडी नाबदरासी । तेचि वेगळी रवेयासी । तैसा अवतार यदुवंशीं । पूर्णांशेंसीं श्रीकृष्ण ॥ २६० ॥ जैसा दीपु लावितां तत्क्षणीं । सर्वेचि प्रगटे तेजाची खाणी । तैसा उपजतांचि बाळपणीं । अभिनव करणी स्वयें केली ॥ ६१ ॥ जें ब्रह्मादिक देवां नव्हे । तें बाळलीला स्वभावें । करूनि दाविलें आघवें । देवाधिदेवें श्रीकृष्णें ॥ ६२ ॥ वणवा गिळिला मुखें । पर्वत उचलिला नखें । पूतनेचें स्तनविखें । प्याला निजमुखें जीवासगट ॥ ६३ ॥ जेणें वत्साहरणमिसें । स्रष्ट्यासही लाविलें पिसें । जो वत्सवत्सपवेशें । झाला सावकाशें एकाकी एक ॥ ६४ ॥ अघ चिरिला चाभाडा । काळियाच्या कुटिल्या फडा । यमलोकीं घेऊनि झाडा । आणिला रोकडा गुरुपुत्र जेणें ॥ ६५ ॥ जे प्रजा पीडूनि कर घेती । जयां नावडे धर्मनीती । ऐसे राजे भारभूत क्षितीं । नेणों किती निर्दाळिले ॥ ६६ ॥ एकां सैन्यें एकां स्वांगें । एकां वधवी

—यापुढें होणारा रामकृष्ण अवतार सांगतात—

भूमेः भरावतरणाय अजन्मा यदुषु जातः सन्–भूभार उतरण्याकरितां जन्मरहित परमात्मा यादव कुलांत उत्पन्न होऊन, सुरैः अपि दुष्कराणि करिष्यति–देवांनाहि दुष्कर अशीं कर्मे करील. (बुद्धावतार सांगतात–) यज्ञकृते अतदर्हान् वादैः विमोहयति–यज्ञासाठीं वाद करून यज्ञ करण्यास योग्य नसलेल्या असुरांना भगवान् मोहित करील. (कल्कीचा अवतार सांगतात–) कलौ अंते शूद्रान् क्षितिभुजः न्यहनिष्यत्–आणि कलियुगांत शेवटीं तो भगवान् शूद्रराजांना मारील. २२.

हे राजा, आतां मी तुला भावी अवतारांचा वृत्तान्त सांगतों. श्रीकृष्णावताराची कथा अत्यंत विचित्र व अद्भुत आहे. ५४ जो परावाणीहून अगदीं पलीकडे आहे, जो अज, अक्षर व वेदशास्त्रांचा अविषय, तो हा श्रीकृष्ण पूर्णावतारच होय. ५५ जथें रामाचा प्रवेश होत नाहीं, रूपाला अवकाश मिळत नाहीं, ज्याच्या स्वरूपीं ब्रह्मत्वहि संभवत नाहीं, तो हा श्रीकृष्ण अवतार होय. ५६ जो वर्णाश्रमांच्या मर्यादेंत सांपडत नाहीं, ज्याला ईश्वरत्वाचाहि स्पर्श सहन होत नाहीं, जो अज, अव्यय व स्वरूपानें स्वानंद तोच हा स्वलीलेनें श्रीकृष्णनाथ अवतार होय. ५७ याप्रमाणें हा श्रीकृष्णाचा अवतार गुण, धर्म व कर्म यांनीं रहित आहे. स्वतः जगन्नाथ स्वेच्छेनें यदुवंशांत प्रकट झाला. ५८ ज्याप्रमाणें पाण्याचे तरंग अतिशय चंचल भासतात, पण तें सर्व पाणीच असतें. माती काळी, लाल, पांढरी इत्यादि अनेक रंगांची असते, पण ती केवळ पृथ्वीच. ५९ साखरेच्या खड्याला जी गोडी असते, तीच त्याच्या कणाला; त्याचप्रमाणें श्रीकृष्ण हा यदुवंशांतील पूर्णावतार होय. २६० दीप लावतांच त्याचे तेज जसें चहूंकडे फांकतें, त्याप्रमाणें श्रीकृष्णानें उपजतांच बालपणीं विचित्र करणी केली. ६१ जें ब्रह्मादिकदेवहि करूं शकले नाहींत, तें सर्व या देवाधिदेवानें बाललीलेनें अनायासानें करून दाखविलें. ६२ मुखानें वणवा गिळिला, नखानें पर्वत उचलिला आणि पूतनेचे प्राण विषासह प्राशन केलें. ६३ गोवत्सांचा अपहार करणें या निमित्तानें त्यानें ब्रह्मदेवालाहि वेड लाविलें. स्वतः एक व अद्वितीय असतांनाहि गायींचीं सर्व वासरें व गोप या सर्वांचा वेश घेतला. ६४ अघासुराचा जाभाडा चिरला, काळियाची फडा कुटली. यमलोकीचा झाडा घेऊन गुरुपुत्राला जशाचा तसाच परत आणिला. ६५ प्रजेला पिडून कर घेणारे, धर्म व नीति यांचा द्रोह करणारे असे पृथ्वीला भारभूत राजे त्यानें किती मारिले याची गणनाच

आन प्रयोगें । एकां गोत्रकलहप्रसंगें । अग्रपूजायोगें एकांसी ॥ ६७ ॥ अधर्मा लावील सीक । धर्माचें वाढवील बिक । हें अवतारकौतुक । राया तूं आवश्यक देखशील पुढां ॥ ६८ ॥ जैं जैं लोटेल अहोरात्र । तैं तैं करील नवें चरित्र । तया कृष्णसुखासी पात्र । भक्त पवित्र होतील ॥ ६९ ॥ साधूंसी स्वानंदसोहळा । नीच नवा होईल आगळा । ते श्रीकृष्णाची लीला । देखसी डोळां नृपनाथा ॥ २७० ॥ तोचि बौद्धरूपें जाण । पुढां धरील दृढ मौन । तेव्हां कर्माकर्मविवेचन । सर्वथा जाण कळेना ॥ ७१ ॥ तो तटस्थपणें सदा । प्रवर्तवील महावादा । तेणें वादमिसें सदा । वाढवील मदा महामोहातें ॥ ७२ ॥ मोह उपजवील दुर्घट । कर्म करवील कर्मठ । एक होतील कर्मभ्रष्ट । न कळे चोखट निजात्महित ॥ ७३ ॥ कैसें माजविल मत । वेद मिथ्या मानित । वेदविहिता नातळत । तो जाण निश्चित महामोहो ॥ ७४ ॥ मोहें केला सर्वांसी छळ । एकां ज्ञानाभिमान प्रबळ । ते कर्म निंदिती सकळ । त्यागिती केवळ जाड्य म्हणौनी ॥ ७५ ॥ ऐशिये वर्ततां मोहस्थिती । पूर्ण कळीची होय प्रवृत्ती । तेव्हां नीच ते राजे होती । प्रजा नागविती चोरप्राय ॥ ७६ ॥ शूद्राहूनि अतिकनिष्ठ । ते राजे होती परमश्रेष्ठ । वर्णावर्ण करिती भ्रष्ट । अतिपापिष्ठ अधर्मी ॥ ७७ ॥ अपराधेंवीण वितंड । भलत्यांसी करिती दंड । मार्गस्थांचा करिती कोंड । करिती उदंड सर्वापहरण ॥ ७८ ॥ अबळांचें निजबळ राजा । तो राजाचि स्वयें नागवी प्रजा । ऐसा अधर्म उपजे क्षितिभुजां । तें गरुडध्वजा न साहवे ॥ ७९ ॥ जेव्हां स्वधर्माचें जिणें । अधर्मीं लागे गांजणें । यालागीं श्रीनारायणें । अवतार धरणें कल्की नामा ॥ २८० ॥ तो शस्त्रधारा प्रबळ । नष्ट राजे निर्दाळील सकळ । महामोहाचें मूळ । स्वयें समूळ उच्छेदील ॥८१॥ तेव्हां धर्माची पाहांट फुटे । सत्यासी सत्व चौपटें । तेव्हां वेदोक्त विधान प्रगटे । स्वधर्मराहाटें राहटती सर्व ॥ ८२ ॥

नाहीं. ६६ कित्येकांना सैन्याच्या हातून, कित्येकांना स्वतः आपल्या हातानें, दुसऱ्या कित्येकांना आणखी कांहीं उपाय योजून कौरव व इतर क्षत्रिय यांना भूमीसाठीं कलह उत्पन्न करून व शिशुपालाला अग्रपूजेच्या निमित्तानें त्यानें मारविलें. ६७ श्रीकृष्णानें अधर्माला शिक्षा करून धर्माचें तेज वाढविलें. हे राजा, त्याचें हें अवतारकौतुक तूं पुढें अवश्य पहाशील. ६८ जशी जशी अहोरात्र लोटेल, तसें तसें तो नवें नवें चरित्र दाखवील. केवळ पवित्र भक्तच त्या कृष्णसुखाला पात्र होतील. ६९ श्रीकृष्णाची ती लीला म्ह० साधूंचा अवर्णनीय व नित्य नवा असा स्वानंदसोहळाच होय. तूं तो आपल्या डोळ्यानें पहाशील. २७० हे भूपते, तोच भगवान् पुढें बौद्धरूपानें दृढ मौन धरील. तेव्हां कर्म व अकर्म यांचें विवेचन कोणालाहि कळेनासें होईल. ७१ तेव्हां तो तटस्थ राहून सर्वदा महावादाला प्रवृत्त करील आणि त्या वादाच्या मिषानें तो सर्वदा मद व महामोह यांना वाढवील. ७२ तो दुर्घट मोह उत्पन्न करील. दांभिकांकडून कर्म करवील. कित्येक तर कर्मभ्रष्टच होतील. आत्महित कोणतें हें चांगल्याप्रकारें कोणालाच कळणार नाहीं. ७३ वेदांना अप्रमाण मानून वेदविधींना उल्लंघून केवळ महामोहात्मक मत तो जगांत माजवील. ७४ मोह सर्वांचा छळ करील. कित्येकांना ज्ञानाचा प्रबळ अभिमान होईल. सर्व लोक कर्मांची निंदा करून, तें केवळ जाड्य आहे, असें समजून त्याचा त्याग करितील. ७५ मोहाची स्थिति इतक्या पूर्णावस्थेस आली असतां कलियुगाची प्रवृत्ति होईल. त्यानंतर नीच लोक राजे होतील व चोरांप्रमाणें प्रजेला नागवितील. ७६ शूद्रांहूनहि अति निकृष्ट असलेले लोक अति श्रेष्ठ राजे होऊन ते वर्ण, आश्रम व इतर जाति यांना भ्रष्ट करितील. कलियुगांत असे अति अधर्मी व मोठे पापी राजे होतील. ७७ अपराधावांचूनच वाटेल त्याला मनसोक्त दंड करितील. सन्मार्गस्थांचा कोंडमारा करितील. लोकांच्या सर्वस्वाचा भयंकर अपहार करितील. ७८ वस्तुतः राजा हें दुर्बळाचें बळ आहे, पण कलियुगांत स्वतः तो राजाच प्रजेला नागवील. राजांमध्यें पुढें असा अधर्म उद्भवेल व गरुडध्वजाला तो सहन होणार नाहीं. ७९ अधार्मिक लोक स्वधर्मनिष्ठांना अशा रीतीनें छळूं लागले असतां श्रीनारायण कल्की-अवतार धारण करील २८० व आपल्या प्रबल शस्त्रधारेनें अशा दुष्ट राजांचा संहार करून महामोहाला समूळ उपटून टाकील. ८१ त्यावेळीं धर्माची पहांट होईल, सत्याचा चौपट उत्कर्ष होईल, वेदोक्त विधान प्रकट होईल व सर्व लोक स्वधर्मानें वागूं लागतील. २८२.

एवंविधानि कर्माणि जन्मानि च जगत्पतेः । भूरीणि भूरीयशसो वर्णितानि महाभुज ॥ २३ ॥

जयाचीं गा अनंत नामें । अनंत अवतार अनंत जन्में । अनंत चरित्रें अनंत कर्मे । अनंतोत्तमें हरिकीर्ती ॥ ८३ ॥ अगाध भगवंताचा महिमा । त्याच्या पार नाहीं जन्मकर्मा । त्याचा अनुष्टुप् हा महिमा । तुज म्यां नरोत्तमा निरूपिला येथें ॥ ८४ ॥ ऐशी अवतारचरित्रनामें । परिसतां विचित्र कर्मे । राजा अत्यंत सप्रेमें । मनोधर्मे निवाला ॥ ८५ ॥ जे जे अवतारीं देवो सगुण । जाहला परी निर्गुणाचे गुण । प्रकट करीताचि आपण । कर्माचरण स्वयें दावी ॥ ८६ ॥ धन्य धन्य ते हरिगण । जे वर्णिती भगवद्गुण । ज्यांचेनि वचनें संपूर्ण । निवे अंतःकरण श्रोत्यांचें ॥ ८७ ॥ श्रोत्यांचें अवधान निवे । तेथ वक्ता स्वानंदसुख पावे । ग्रंथ वोसंडे स्वभावें । साहित्यगौरवें रसाळ ॥ ८८ ॥ जेवीं चंद्रकरें साचा । मुखबंद सुटे चकोरांचा । तेवीं एका जनार्दनाचा । संतकृपा वाचा फुटली त्यासी ॥ ८९ ॥ जेवीं सूर्यकिरणस्पर्शें । कमळकळी स्वयें विकासे । तेवीं संतकृपासौरसें । ग्रंथु विकासे अर्थावबोधें ॥ २९० ॥ तेचि कृपेनें तत्वतां । अर्थिलें श्रीभागवता । आतां पंचमाध्यायीं कथा । सावध श्रोतां अवधारिजे ॥ ९१ ॥ राजा प्रश्न करील गोड । जो परिसतां पुरेल कोड । साधकांची उपशमेल चाड । होय निवाड धर्माचा ॥ ९२ ॥ जेथ भजना भजन हातवटी । प्रश्नोत्तरें कथा गोमटी । अतिशयें रसाळ गोठी । जेणें सुटे गांठी अधर्माची ॥ ९३ ॥ तें उत्तमोत्तम निरूपण । भरीत संतांचें श्रवण । जनार्दनकृपा पूर्ण । एका जनार्दन सांगेल ॥ ९४ ॥ अंगीं वारियाचेनि संचरणें । घुमारा घुमों लागे तेणें । तेवीं एकाजनार्दनें । कविता करणें निजांगें ॥ २९५ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे एकादशस्कंधे निमिजायंतसंवादे एकाकारटीकायां चतुर्थोऽध्यायः ॥ ४ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

इति श्रीमद्भागवते महापुराणे एकादशस्कंधे चतुर्थोऽध्यायः ॥ ४ ॥

हे महाभुज– हे पराक्रमी राजा, भूरियशसः जगत्पतेः– ज्यांचे विपुल यश आहे अशा जगत्पतीचीं, एवंविधानि भूरीणि कर्माणि जन्मानि च वर्णितानि–अशा प्रकारचीं असंख्य कर्मे व जन्म यांचें मीं वर्णन केलें. २३.

हे राजा, ज्या भगवानाचीं नामें, अवतार, जन्म, चरित्रें व कर्मे हीं सर्व अनंत आहेत व ज्या हरीची सर्वोत्तम कीर्तिहि अनंत आहे ८३ त्या अनंताचा महिमा काय वर्णावा ! त्याच्या जन्मकर्मांना सीमा नाहीं. तथापि हे राजा, मीं तुला हा त्याचा महिमा थोडक्यांत सांगितला आहे. ८४ भगवानाचे हे अवतार, विचित्र कर्मे व चरित्रनामें ऐकून राजाच्या अंतःकरणाला प्रेमाचा पाझर फुटला. त्याचे सर्व मनोधर्म शांत झाले. ८५ ज्या ज्या अवतारमध्यें देव सगुण झाला, त्या त्या अवतारांत तो आपल्या निर्गुणाचे गुण प्रगट करीतच स्वतः कर्माचरण करून दाखविता झाला. ८६ जे भगवद्गुणांचें वर्णन करितात व ज्यांच्या वचनानें श्रोत्यांचें अंतःकरण शान्त होतें ते हरिभक्त धन्य धन्य होत. ८७ श्रोत्यांची वृत्ति शांत झाली कीं, वक्त्याला परम संतोष होतो आणि श्रोता व वक्ता या दोघांचीहि वृत्ति तन्मय झाली असतां ग्रंथ सर्व साहित्यगुणांनीं युक्त असा होऊन स्वभावतःच सरस ओघानें वाहूं लागतो. ८८ चंद्रकिरणांनीं चकोराची तोंडें जशीं उघडतात, त्याप्रमाणें श्रीजनार्दनस्वामी व इतर संत यांच्या कृपेनें या एकनाथाला वाचा फुटली आहे. ८९ सूर्यकिरणांचा स्पर्श होतांच जसा कमळाचा कळा आपोआप फुलतो, त्याप्रमाणें संतांच्या कृपाप्रसादानें हा ग्रंथ अर्थज्ञानानें आपोआप विकास पावत आहे. त्यांच्याच कृपेनें खरोखर श्रीमद्भागवताचा हा अर्थ आपोआप बाहेर पडत आहे. २९० आतां पांचव्या अध्यायांतील कथा श्रोत्यांनीं सावधान मनानें ऐकावी. ९१ राजा पुढें गोड प्रश्न करील. तो ऐकून श्रोत्यांचे कोड पुरतील, साधकांची साधनेच्छा पूर्ण होईल व धर्माचा निवाडा होईल. ९२ त्यांत भजनाला भजनाची हातवटी साधेल. प्रश्नोत्तर रूपानेंच ती कथा फार सुंदर होणार आहे. त्यांतील गोष्टीहि अतिशय रसाळ आहेत. त्या ऐकून अधर्माची गांठ आपोआप सुटेल. ९३ तें उत्तमोत्तम निरूपण संतांच्या श्रवणांना भरून काढील. श्रीजनार्दनाच्या कृपेनें हा एका जनार्दन तें पूर्णपणें सांगेल. ९४ अंगांत जसा पिशाचाचा संचार व्हावा आणि मग त्यानें घुमावयाला लागावें त्याप्रमाणें एका जनार्दनानें स्वतःच हें कवित्व करणें आहे. २९५.

इति श्रीमद्भागवतपुराणांतील एकादशस्कंधाचा परमहंससंहितेमधला श्रीधर-एकनाथविरचित टीकानुसार विष्णुशर्मेकृत सान्वयार्थ-भावार्थासह निमिजायंतसंवादांतील मायाकर्मब्रह्मनिरूपण नांवाचा चवथा अध्याय समाप्त झाला.